# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००९ |
| वर्ष | : | दहावे |
| अंक | : | १२ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**


**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : १४७**

MAHMAR 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रासारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

# व्ही. पी. एम्. दिशा



वर्ष दहावे / अंक १२ / नोव्हेंबर २००९

## संपादकीय

## नोबेल पुरस्कार

ऑक्टोबर महिन्यात विविध क्षेत्रांतील नवीन संशोधने, असामान्य कर्तृत्व यांसाठी दिली जाणारी नोबेल पारितोषिके जाहीर झाली. त्यामध्ये रसायनशास्त्रातील प्रतिजैविकांसंबंधातील संशोधनासाठी डॉ. व्यंकटरमण रामकृष्णन यांना अमेरिकेचे थॉमस स्टिट्झ आणि इस्त्राईलच्या अदा योनाथ यांच्यासह विभागून पारितोषिक जाहीर झाले. पेशींमधील रायबोसोम्सचे नकाशे (मॅपिंग) तयार करण्याच्या कामगिरीबद्दल हे पारितोषिक आहे. डॉ. रामकृष्णन हे भारतीय वंशाचे असल्याने एका भारतीयाला हा पुरस्कार मिळाला याबद्दल आनंद व्यक्त केला गेला. परंतु या आनंदाबरोबरच ते भारतीय वंशाचे अमेरिकास्थित शास्त्रज्ञ आहेत हेही लक्षात घ्यावे लागले.

भारतात किंवा भारतीय वंशात जन्म होऊन परदेशांत राहून नोबेल पुरस्कार मिळवणारे शास्त्रज्ञ हे भारतीय मानले तरी त्यांचे नागरिकत्व परदेशी आहे, त्यांनी केलेले संशोधन हे भारतात नाही तर परदेशातील सोयींमुळे ते करू शकले आहेत हे कटु असले तरी सत्य आहे.

१९६८ साली असेच विभागून पारितोषिक मिळालेले डॉ. हरगोविंद खोराना, १९८३ साली भौतिकशास्त्रातील नोबेल मिळवणारे सुब्रमण्यम चंद्रशेखर, त्रिनिनाद येथे जन्म झालेले भारतीय वंशाचे २००१ सालचे साहित्यातील नोबेल मिळालेले व्ही. एस. नायपॉल, २००७ साली विभागून नोबेल मिळालेले पचौरी हे सर्व विजेते व त्यांनी केलेले त्यांच्या त्यांच्या क्षेत्रातील महत्त्वाचे काम यांचा विचार करता त्यांचे कर्तृत्व भारतात बहरले नाही हे प्रकर्षाने जाणवते.

हे व असे शास्त्रज्ञ काम करू शकतील, आपल्या विषयात मूलभूत योगदान देऊ शकतील असे वातावरण, अशा प्रयोगशाळा भारतात नाहीत असा याचा अर्थ काढता येऊ शकेल. भारतातील स्वार्थलोपुप राजकारणाने, राजकीय सामाजिक क्षेत्रातील इच्छाशक्तीच्या अभावाने 'विकासाचे राजकारण' ही केवळ बोलण्याची बाब बनत आहे. जीवनावश्यक अशा कोणत्याही क्षेत्रात विकासाच्या सुवर्णसंधींचा अभाव, अशा संधी देऊ पाहणाऱ्या शिक्षण संस्थांचे पंख छाटणे

(कव्हर क्रमांक २ वर)

(मुखपृष्ठावरून)
संपादकीय
**नोबेल पुरस्कार**

यामुळे प्रचंड क्षमता असणाऱ्या संशोधकांना त्या क्षमता सिद्ध करण्याचा वाव आपण देऊ शकत नाही. अति विशेषीकृत प्रयोगशाळा, ग्रंथालये यांच्या उपलब्धतेमुळे हे काम परदेशात जाऊन करणारे अनेक भारतीय स्वातंत्र्य मिळून ६० वर्षे होऊन गेली तरी आहेत, हे कोणत्या विकासाचे गमक आहे?

तामिळनाडूतील चिदंबरम येथे जन्म झालेल्या व भारतीय विद्यापीठातून पदवी प्राप्त केलेल्या डॉ. वेंकटरामन रामकृष्णन यांच्या निमित्ताने हा विचार पुन्हा करायला हवा. विद्या प्रसारक मंडळाच्या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील योगदानातून, व्यवस्थापन क्षेत्रातील योगदानातून सुसज्जतेचा प्रयत्न करताना आम्हांला येणाऱ्या अडचणी पाहिल्या की हे प्रकर्षाने जाणवते. एखाद्या क्षेत्रात नैपुण्य मिळवण्यासाठी लागणारी आधारभूत संरचना उपलब्ध करून देऊ पाहणाऱ्या शिक्षणसंस्थांनाही अनेक कारणांसाठी अडून रहावे लागते. शिक्षण, संशोधन या अंगभूत कार्याऐवजी दैनंदिन व्यवहारातील लहानमोठे प्रश्न सोडवण्यात त्यांना आपल्या शक्ती वाया घालवाव्या लागतात. यामुळे सर्वोत्तम विकासाचे स्वप्न हे स्वप्नच उरते.

डॉ. वेंकटरामन रामकृष्णन यांच्या यशाचा साभिमान आनंद आम्हांलाही आहे. किंबहुना भारतीयांच्या क्षमतेचा आवाका त्यांनी सिद्ध केला याबद्दल असा अभिमान वाटायलाही हवा. पण, नोबेलसारखी आंतरराष्ट्रीय मान्यता मिळवायला भारताच्या सीमारेषा ओलांडून जावे लागणे या वास्तवामुळे विकासाचे संदर्भ तपासून पहायला हवेत असेही वाटते.

•••




वर्ष दहावे / अंक १२ / नोव्हेंबर २००९

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १५ वे / अंक ५ वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे – ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email : perfectprints@gmail.com

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | शाळा – मुलांची गरज | सौ. विशाखा देशपांडे | ३ |
| २) | किमती वस्तू | श्री. यशवंत माने | ६ |
| ३) | सनातन धर्माची मूलतत्त्वे | श्री. शं. बा. मठ | ८ |
| ४) | द्वारका दर्शन | श्रीमती आशा भिडे | १८ |
| ५) | 'ओसामा' | सौ. प्रिती कुलकर्णी | २० |
| ६) | पुस्तक परिचय | श्री. मोहन पाठक | २२ |
| ७) | भारतीय संस्कृती – बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | २४ |
| ८) | परिसर वार्ता | संकलित | ३४ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# आवाहन

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे ही संस्था ठाण्यात गेली ७५ वर्षांहून अधिक काळ शिक्षण क्षेत्रात कार्य करीत आहे. मराठी व इंग्रजी शाळांबरोबरच कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, व्यवस्थापन शाखांची महाविद्यालये, तंत्रनिकेतन व प्रगत अभ्यास केंद्र अशा सर्वांगीण शिक्षणाची सोय संस्थेने केली आहे. पाठ्यपुस्तकीय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या अंगचे कला, क्रीडा इ. क्षेत्रातील गुण विकसित व्हावेत म्हणून विविध उपक्रम संस्था राबवीत आली आहे. या सर्वांच्या परिणामस्वरूप संस्थेचे विद्यार्थी अभ्यास व अभ्यासेतर परीक्षा व स्पर्धांत उत्तम यश मिळवीत असून संस्थेचे माजी विद्यार्थी समाजात विविध क्षेत्रांत कार्यप्रवण आहेत.

दूरदर्शन, सिनेमे व सवंग नियतकालिके भोगवादी, नीतीहीन संस्कृतीचा प्रसार करण्यात अग्रेसर आहेत. याउलट विधायक, संस्कृतिरक्षक विचार पोचवतील अशी माध्यमे अल्पसंख्य आहेत. संस्कारक्षम विद्यार्थ्यांना, वाचकांना, नागरिकांना वैचारिक खाद्य पुरवावे, त्यांच्यात ईर्षा निर्माण व्हावी व त्यांनी अर्थार्जन व व्यावसायिक यशाबरोबरच सामाजिक कार्य साधावे, या उद्देशाने मंडळाने **'दिशा'** हे नियतकालिक जुलै १९९६ पासून सुरू केले आहे.

**या मासिकाचे वर्गणीदार होऊन, या मासिकात जाहिरात देऊन किंवा लेख पाठवून आपण आमच्या कार्याला हातभार लावावा ही विनंती !** तसेच, आपल्या अमूल्य देणग्या देऊनही आपण दिशासाठी हातभार लावू शकता.

संपादक, दिशा
**विद्या प्रसारक मंडळ,**
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०

**टीप** : वर्गणी /जाहिरात वा देणगीची रक्कम धनादेशाने पाठवावी. धनादेश (चेक) **''विद्या प्रसारक मंडळ A/c दिशा''** या नावाने पाठवावा.

**वार्षिक वर्गणी रु. २५०/-**

अंकाची किरकोळ विक्रीची किंमत रु. २५/- फक्त.

वर्गणी पाठविताना आपला पूर्ण पत्ता, टपाल सूची क्रमांक (पिनकोड नंबर) व दूरध्वनी क्रमांक कळवावा.

# शाळा - मुलांची गरज

*मुलांच्या मेंदूची वाढ होईल असे पोषक वातावरण पुरवणाऱ्या शाळा आपण अनुभवतो का? आपल्या लहान मुलांचे वाढीचे संदर्भ तपासावेसे वाटतील असे अंर्तमुख करणारे हे विचार – संपादक*

'शाळा म्हणजे आनंदवाड्या हव्यात, कोंडवाडे नकोत' अशी जी काही प्रत्येक मुलाची मूक भावना असते ती अगदी खरी आहे. 'खेळ' हा मुलाच्या आयुष्यातील अविभाज्य घटक आहे. मुलांचे दिवसातले अगदी काही तासच का असेनात, परंतु जे महत्त्वाचे आहेत ते शाळेमध्ये जातात. तेव्हा हे तास अगदी ताण विरहित आणि आनंदात जावेत असे वातावरण नेहमीच शाळेत असावे. परंतु आपल्याकडे शाळा म्हणजे बंदिस्त असा वेगळ्या प्रकारचा 'तुरुंग' असंच चित्र दिसत असतं. खेळता खेळता शिकणे आणि शिकता शिकता खेळणे हा जो प्रकार आहे हा काही अपवाद वगळता कुठल्याच शाळांमध्ये आढळून येत नाही.

ताण विरहित मेंदू आधारित शिक्षणासाठी जे काही पूरक वातावरण लागतं, किमान सुविधा लागतात त्या बाबतीत आपण आज विचार करणार आहोत. त्यामध्ये सुद्धा मुलांचे शिक्षण जिथे खऱ्या अर्थाने सुरु होते, जिथे त्याचा खऱ्या अर्थाने सामाजिक विकास व्हायला सुरूवात होते, अशा बालमंदिरांविषयी आपण आज विचार करणार आहोत. गेल्या वेळेच्या भागामध्ये आपण मेंदूविषयक संशोधनामधून पुढे आलेले बारकावे, त्यामुळे एक नवी दृष्टी कशी प्राप्त झाली आहे, त्याबद्दल माहिती करून घेतली. आज त्याच शास्त्राच्या आधारे, शाळांमधील, विशेषत: बालमंदिरे, शिशुमंदिरे, बालवाड्या या कशा असाव्यात या बद्दल थोडीशी चर्चा करणार आहोत.

जन्मल्यापासूनच मूल आजूबाजूच्या वातावरणातून अनुभव घेत असते आणि त्याद्वारे आपल्या मेंदूमधील चेता पेशींची जुळणी करीत जाते. अनुभव आपलेसे करणे आणि अनुभवांचा आपल्या पुरता अर्थ लावत जाणे हेच मुलांचे 'शिकणे' असत. त्यामुळे आजूबाजूचं वातावरण अनुभवांच्या बाबतीत जेवढं प्रगल्भ असेल तेवढी चेतापेशींची जुळणी जास्तीत जास्त होते आणि शिकण्याची प्रक्रिया वेगाने आणि परिणामकारक होते. परंतु काही वेळा या प्रक्रियेत अडथळाही येत असतो. म्हणजे मनावर जर ताण असेल तर विचार प्रक्रियाच खुंटते. इथे शास्त्रीय भाषेत Downshifting सुरू होतं. Downshifting म्हणजे, अशा ताणामुळे, जिथे विचार कार्य घडत असतं अशा Neocortex या मेंदू कडून घसरण होऊन, भावना उद्दीपित करणाऱ्या मॅमेलियन मेंदूच कार्य घडू लागत आणि तो ताण अगदी असह्य झाला की मग जीवन मरणाच्या प्रश्नाभोवती कार्यरत असणाऱ्या Reptalian Brain, म्हणजे सरपट मेंदूच्या पातळीवर घसरण होते. मग अशावेळी विचार तर दूरच, उलट मुले विचारांपासून पलायन करतात. तेव्हा शिक्षक आणि पालकांनी हे लक्षात घेतलं पाहिजे की लहान मुलांना शिक्षा करून आणि मारून त्यांच्याकडून बौद्धिक काम होऊच शकत नाही.

लहान मुलं स्वभावत:च खूप चळवळी असतात. आणि ही जी चळवळ असते ही त्यांच्या विकासाच्या दृष्टीने अतिशय आवश्यक असते. मेंदूच्या दोन्ही, म्हणजे उजव्या आणि डाव्या बाजूचे परस्परसंबंध घट्ट करण्यासाठी ही शारिरिक हालचाल महत्त्वाची ठरते. तेव्हा 'हाताची घडी आणि तोंडावर बोट' हा सार्वत्रिक नियम मुलांचं नुकसान करत असतो.

बालवाड्यांमध्ये किंवा प्राथमिक शाळांमधे बसण्याची व्यवस्था किंवा रचना ही लवचीक असावी आणि मुलांना अनेक प्रकारे बसता यावं, जमीनीवर, स्टुलावर, खुर्चीवर बसता येईल अशा प्रकारची बैठक व्यवस्था असावी. अत्यंत कमी जागा असलेल्या बालवाड्यांमध्ये किंवा बालशाळांमध्ये जमीनीवरची बैठक व्यवस्था असावी. शाळांतील बाकांवर अनेक तास बसविल्याने मुलांची बौद्धिक क्षमता घसरते, हे शाळांना कळायला हवं आणि पालकांनी, माझ्या मुलाला जमिनीवर बसावं लागतंय म्हणून वाईट वाटून घेऊन शाळेला दोष देण्यापेक्षा हे शास्त्र समजून घेणं आवश्यक आहे.

मुलांना प्रेमळ, प्रसन्न आणि मोकळ्या वातावरणात वावरायला खेळायला आवडतं. तेव्हा शाळांच्या खोल्या मोकळ्या व हवेशीर असाव्यात, ज्यामध्ये भरपूर सूर्यप्रकाश असेल. शिक्षिकेसाठी फळ्याची व्यवस्था न करता मुलांसाठी लिहायला, गिरगटवायला, चित्र काढायला हा फळा उपलब्ध करून द्यावा. मोठ्या मोठ्या चित्रांची पुस्तके किंवा रंगीत वर्तमानपत्रे मुलांच्या हाताशी लागतील अशी असावीत आणि त्यांना ती हाताळण्यास द्यावीत. पुस्तकांची अवस्था बघून मुलांनी त्याचा किती वापर केलाय हे लगेच कळते.



प्रत्येक मुलाचा स्वत:चा असा 'मी' पणा असतो. त्यामुळे प्रत्येक ठिकाणी त्याच्या या 'मी' पणाला वाव दिल्यास त्याचा आत्मसन्मान उंचावत असतो. म्हणून प्रत्येक मुलाच्या वैयक्तिक गोष्टी ठेवण्यास प्रत्येकाला एखादा कोपरा, किंवा रॅक, किंवा कपाट असल्यास उत्तमच. परंतु हे सर्वच ठिकाणी शक्य नसतं तेव्हा उपलब्ध जागेमधे पाच पाच मुलांच्या गटाला आळीपाळीने संधी द्यावी.

बालशाळेला पटांगण, बगीचा, खेळाचं ठिकाण असावं हे नव्याने सांगायला नकोच. परंतु ज्या ठिकाणी ते काही कारणास्तव नसते तिथे मोकळ्या खोलीमधे विविध प्रकारचे शारिरिक हालचालींचे खेळ अभ्यासक्रमात समाविष्ट करावेत. हे स्थूल स्नायूंच्या विकासासाठी महत्त्वाचे ठरतात. मुलांचा विकास हा मोठ्या कडून लहानाकडे आणि मूर्ता कडून अमूर्ता कडे अशा क्रमाने होत असतो. तेव्हा स्थूल स्नायूंचा विकास घडून आल्यानंतरच सूक्ष्म स्नायूंचा विकास होत असतो. तेव्हा हे लक्षात घ्यायला हवं की, सूक्ष्म स्नायूंचा विकस घडून आल्याशिवाय मुलं लिखाण करण्यासाठी सक्षम होऊ शकत नाहीत. मेंदू संशोधनाची शिक्षण विषयक तत्वे सांगतात की Learning engages the entire physiology. तेव्हा या विकास प्रक्रियेचा मेंदू मधील विद्युत प्रक्षेपणावर परिणाम होत असतो, ज्याचा शिकण्यावरही परिणाम होत असतो.

बालशाळेतील खोल्यांमधे एक विज्ञान कोपरा असावा जिथे छोटस टेबल किंवा टी पॉय असाव. याला 'कुतुहल कोपरा' अस सुद्धा म्हणता येईल. मुलांना जे नव दिसेल आणि त्या बाबत जिज्ञासा, कुतुहल जागृत होईल असं काहीही म्हणजे अगदी दगड-माती पासून चित्रांपर्यंत काहीही, ते त्यांनी आपल्या मित्र-मंडळींना दाखवण्यासाठी शाळेत आणून या 'कुतुहल कोपऱ्या'मधे मांडावे आणि बालवाडीच्या ताईंनी मुलांशी या गोष्टींवर चर्चा करावी. स्वत: माहिती सांगण्यापेक्षा, मुलांना असलेली माहिती विचारावी. अशाने मुलं बोलकी पण होतात आणि त्यांचा आत्मसन्मानही बळावतो.

मुक्त खेळासाठी एखादी खोली किंवा जागा उपलब्ध करून द्यावी जिथे प्रौढांचे मार्गदर्शन न घेता मुले स्वत:च्या मनाने मनमोकळी खेळतील. त्यामधे ठोकळे, बिल्ले, बिया, मणी, प्लास्टिकच्या बादल्या, त्याची झाकणं,



चिंध्या अशा अनेक गोष्टी असाव्यात आणि त्यांना त्यांच्या कल्पनेप्रमाणे हवं तसं खेळायला मोकळीक असावी. एखाद्या कोपऱ्यात बाहुली घराची रचना करून, भातुकलीचा खेळ मांडावा.

सुवास हा मेंदू प्रफुल्लीत करण्यासाठी मदत करतो तेव्हा विविध सुवासिक वस्तू जशा उदबत्त्या, निरनिराळ्या प्रकारची फुलं त्या त्या सिझनप्रमाणे एखाद्या बशीत किंवा बाऊलमधे ठेवावीत. संगीतामुळेही वातावरण प्रसन्न रहाण्यास मदत होते. तेव्हा कलेच्या किंवा मुक्तखेळाच्या तासिकेला किंवा खाऊच्या वेळेमधे मंद संगीत चालू ठेवावे. यामध्ये निरनिराळी वाद्ये असावीत, शास्त्रीय गायक-गायिकांच्या कॅसेट असाव्यात.

बालवाडीतील बाह्य सुशोभन कल्पकतेने केलेलं असावं. भिंतींचे रंग, मुलांच्या बसण्याचं फर्निचर हे गडद परंतु आल्हाददायक रंगाचं असावं. मुलांनी काढलेली चित्र ही बोर्डावर लावलेली असावीत. मात्र सर्व मुलांची चित्रे लावावीत. कोणाचेही वगळू नये कारण ही त्यांच्या कल्पनेतून साकार झालेली सृजनशीलता असते. त्याला चांगली - वाईट अशी परिमाणे नसतात. त्यांनी केलेल्या ठसे कामांची, इतर कलात्मक गोष्टींची तोरणे बनवून खोल्यांमधे आकर्षक पद्धतीने प्रदर्शित करावी. अशा तोरणांमधे विविध प्राणी, फुले, पक्षी, रंग, शब्द यांच्या चित्रांच्या अशा तोरणांचाही समावेश होऊ शकतो. जुन्या कॅलेंडरमधून अनेक सुंदर सुंदर चित्र मिळतात. ती शैक्षणिक अंगाने विचार केल्यास खूपच उपयोगी ठरतात. मुलांकडून अशी कॅलेंडरस् मागवून त्याचा सुशोभनासाठी उपयोग करता येतो. छोटासा Fish-tank किंवा बदक, ससे असे प्राणी जागेच्या उपलब्धतेनुसार ठेवावेत.

यामधून पुन्हा मुलांचा 'मी' पणा जागृत होऊन आत्मसन्मान बळावतो. मुलांना निसर्गाकडे नेण्यासाठी तसेच बागेमधे लहान लहान वाफे तयार करून मोहरी, मेथी या गोष्टी लावायला शिकवाव्यात. या मधून वैज्ञानिक दृष्टीकोन पण तयार होतो आणि निसर्गाचा, परिसराचा अभ्यासपण होतो.

अशा प्रकारचं मेंदू सुसंगत वातावरण बालशाळांमधे असेल तर मुलांना सुट्टीच्या दिवशीपण अशा शाळेत यायला आवडेल आणि शाळा सुटल्यानंतर ही घरी जावंसं वाटणार नाही.

(आकाशवाणीवर झालेल्या व्याख्यानावरून - आकाशवाणीच्या 'अस्मिता' वाहिनीचा सौजन्याने.)

**सौ. विशाखा देशपांडे**
ए. के. जोशी इंग्रजी माध्यम शाळा,
नौपाडा, ठाणे

•••

## *उपनिषदांसंबंधी*

*'दिशा' मध्ये गेली अनेक वर्षे विविध विषयांवर लेखमाला देणारे अभ्यासक **श्री. शंकरराव मठ** यांची **उपनिषदां** संदर्भातील विशेष लेखमाला डिसेंबरपासून सुरू करीत आहोत. वाचकांनी या संग्राह्य लेखांचे परिशीलन अवश्य करावे.*

# किमती वस्तू

*किमती वस्तूंचा हव्यास असणारे आपण शरीराची काळजी मात्र घेत नाही. या वस्तूंचा उपभोग घेण्यासाठी शरीरच धड नसेल तर 'किंमत' या संकल्पनेला अर्थ उरेल काय? – संपादक*

आपण आपल्या आयुष्यात अनेक वस्तूंचा उपभोग घेत असतो. त्यापैकी काही वस्तू कमी किमतीच्या तर काही वस्तू जास्त किंमतीच्या असतात. सर्वसाधारणपणे जी वस्तू मिळवण्यासाठी खूप कष्ट घ्यावे लागतात, जी वस्तू आपणास सहजा-सहजी मिळत नाही किंवा ज्या वस्तूंची किंमत जास्त असते आशा सर्व वस्तूंना आपण किंमती वस्तू म्हणतो. घर, गाडी, बंगला, सोने, माणिक, मोती, हिरे अशा वस्तूंच्या किंमती खूप असतात. म्हणून त्यांना आपण जास्त महत्त्व देत असतो. त्यांच्या मोहात अडकत असतो. म्हणून तर त्यांना आपण जिवापाड जपत असतो. अशा वस्तूंना थोडा जरी धक्का लागला किंवा ती वस्तू थोडी खराब झाली तर आपण खूप काळजी करीत असतो. एवढी काळजी करतो की, अशावेळी आपल्या शरीराची देखील पर्वा करीत नाही. आपल्या जीवापेक्षाही अशा वस्तूंची आपण जास्त काळजी घेत असतो. त्यांची देखभाल करीत असतो.

अशा किंमती वस्तू मिळविण्यासाठी आहोरात्र प्रयत्न करीत असतो. त्यासाठी वाटेल ते करण्याची तयारी असते. अनेक लोक तर अशा वस्तू मिळवण्यासाठी दुसऱ्यांचा प्राण घ्यायलाही मागे पुढे पहात नाही. केवळ संपत्ती जमा करणे एवढाच त्यांचा उद्देश असतो. अशा व्यक्ती संपूर्ण आयुष्य संपत्ती जमा करण्यातच घालवत असतात पण जी संपत्ती जमा केलेली असते तिचा उपभोग घ्यायला मात्र त्यांच्याकडे वेळ नसतो. मग अशी संपत्ती काय कामाची? आज अनेक सावकार किंवा धनिक व्यक्ती, अशाही दिसून येतात की, त्यांच्याकडे खूप नवीन आकर्षक वस्तू असतात पण त्याचा ते जाणून बुजून उपयोग करीत नाहीत. ती वस्तू खराब होईल म्हणून जुनीच वस्तू वापरणे पसंद करतात. आणि पुन्हा नवीन वस्तू जुनी झाली की मगच तिचा वापर करतात. नवीन वस्तू वापरण्याचा योगच त्यांच्या नशीबी नसतो.

आपले शरीर अमूल्य आहे. शरीराचा प्रत्येक भाग एवढा महत्त्वाचा असतो की, त्याची किंमतच होऊ शकत नाही. परंतु अशा शरीराची आपण हवी तशी काळजी घेत नाही. या शरीराला बाहेरून हवे तसे सजवत असतो. अनेक प्रकारचे किंमती अलंकार घालून त्याला मढवत असतो. परंतु या शरीराच्या आत अनेक महत्त्वाचे भाग आहेत, त्या भागांच्या क्रियेवरच संपूर्ण शरीर चालत असते. अशा भागांकडे मात्र आपण हवे तसे लक्ष देत नाही, त्यांची योग्य ती काळजी घेत नाही. त्यांना काय हवे किंवा काय नको हे आपण पहातच नाही. ज्याप्रमाणे रस्त्याच्या कडेला कचराकुंडीत कचरा टाकला जातो त्याचप्रमाणे आपण आपल्या शरीरात कळत नकळत अनावश्यक वस्तू टाकत असतो. अशा वस्तूंची शरीराला गरजही नसते. उदा. आपल्या शरीरास तंबाखू, गुटखा, दारु इ. प्रकारच्या वस्तूंची गरज नसतानाही अशा स्वरूपाचा कचरा आपण आपल्या शरीरात टाकत असतो. अशा वस्तूंच्या सेवनापासून शरीराची हानी होत असते. हे आपण विसरून जातो. शरीराबरोबरच आपले कुटुंबही व्यसनापासून बरबाद होत असते याचा आपण विचारही करीत नाही. स्वर्ग म्हणजे आनंदाचे ठिकाण तर नरक म्हणजे दु:खाचे ठिकाण होय. पण माणसाला नरकाचेच जास्त आकर्षण

वाटत असते. दारू, तंबाखू हे माणसाला नरकाकडेच घेऊन जातात. पण दुर्दैवाने याचेच माणसाला आकर्षण असते. बदाम, पिस्ता, लोणी इ. पदार्थ स्वर्गातील आनंदाप्रमाणे असतात पण त्याकडे मात्र आपण दुर्लक्ष करीत असतो.

ज्यावेळी शरीराचा एखादा भाग नष्ट होतो किंवा खराब होतो त्यावेळीच त्याची किंमत आपणास कळत असते. मानवी शरीर हे परमेश्वराने आपणास फुकट दिलेली देणगी आहे. त्यासाठी आपणास कोणतीही किंमत मोजावी लागत नाही आणि जी वस्तू फूकट मिळते त्याची आपणास किंमत वाटत नाही. फुकट मिळालेल्या वस्तूंचा हवा तसा वापर करण्याचा मानवी गुणधर्मच आहे. दात पडल्यानंतर जेवण खात असतांनाच त्याची किंमत कळून येते. डोळे आंधळे झाल्यानंतरच डोळ्यांचे महत्त्व समजून येते. किंवा आपली एखादी किडनी खराब झाल्यानंतर ती बसवण्याची वेळ येते त्यावेळीच तिची किंमत कळते. पण दुर्दैवाची गोष्ट अशी की, अशा अमूल्य स्वरूपाच्या अवयवांची आपण योग्य ती काळजी न घेता भौतिक वस्तूंची नको तेवढी काळजी करीत असतो. घर, बंगला पडला तर पुन्हा नवीन बांधता येते. कार किंवा गाडी खराब झाली तर पुन्हा नवीन विकत घेता येते. सोने, हिरे, मोती हरवले तर पुन्हा मिळवता येतात. पण अमूल्य स्वरूपाचे शरीर कितीही प्रयत्न केला तर पुन्हा मिळत नाही. म्हणून या शरीराचा कचराकुंडीसारखा उपयोग करू नका. त्याची योग्य ती काळजी योग्य वेळीच घ्या.

ज्याप्रमाणे पृथ्वीवरील प्रत्येक कणाकणात परमेश्वराचा अंश असतो. त्याचप्रमाणे प्रत्येक व्यक्तीच्या शरीरात त्याचे वास्तव्य असते. म्हणून तर 'देह हे देवाचे मंदिर' आहे असे म्हटले जाते. आपण या मंदिररूपी देहाची योग्य ती काळजी घ्यायला हवी. मंदिरामध्ये शांतता, स्वच्छता असते तसेच त्या ठिकाणी देवाचे वास्तव्य आहे असे समजून देवदर्शनासाठी मंदिरामध्ये जात असतो. आणि जर त्याच मंदिरामध्ये अस्वच्छता गोंगाट अशा स्वरूपाचे वातावरण असेल तर त्याठिकाणी जाण्याचे आपण टाळतो. अशा ठिकाणी जाण्यासाठी आपले मन तयार होत नाही. त्याचप्रमाणे देह हे एक मंदिर आहे. या देहाला केवळ बाहेरून न सजवता आतून सजवले पाहिजे, त्याला आतून स्वच्छ आणि निर्मळ ठेवले पाहिजे. ते आतून स्वच्छ आणि निर्मळ असेल तरच त्याठिकाणी परमेश्वर वास्तव्य करेल. परमेश्वराला देहात थोडी विश्रांती घ्यावी वाटेल. त्यासाठी आपणास दारू, तंबाखू, गुटखा यांच्या सेवनाबरोबरच राग, लोभ, मोह यांनाही नष्ट करायला हवे.

**श्री. यशवंत माने**
अबोली, बी - १०३,
सुभाष रोड, कुंभारखान पाडा,
डोंबिवली (प.), जि. ठाणे

•••

## दिशा संशोधनाच्या

अमेरिकेतील एलएसएम वस्तुसंग्रहालयाच्या पर्यावरण शास्त्रज्ञांनी अंटार्क्टिकावरील विविध नमुन्यांचा अभ्यास करून असा एक निष्कर्ष काढला आहे की, दीड कोटी वर्षांपूर्वी अंटार्क्टिकावरील हवामान उष्ण होते. त्यावेळी येथे पाणी, शैवाल आणि वनस्पती यांचे अस्तित्व होते. या संबंधात त्यांचे संशोधन चालू आहे. आज मात्र या खंडाची ओळख सर्वाधिक शीत आणि बर्फाच्छादित खंड अशी आहे.

•••

# सनातन धर्माची मूलतत्त्वे

*ज्ञानावर आधारित अशा सनातन धर्माविषयीचा हा अभ्यासपूर्ण लेख आहे. इतर धर्म आणि सनातन धर्मातील फरक स्पष्ट करून सनातन धर्माचा पाया कसा मजबूत आहे याबद्दलचे विवेचन या विषयावरील साहित्यात महत्त्वाचे ठरेल, असे झाले आहे – संपादक*

**सनातन धर्म :**

प्राचीन, अर्वाचीन इत्यादी कालवाचक शद्ब आहेत. त्यांना एक प्रकारची कालमर्यादा आहे. जे अनादी अनंत असते ते अमर्यादित असते. जे चिरंतन असते ते शाश्वत असते. ते स्वयंभू असते. त्याला स्थल काल याच्या मर्यादा संभवत नाहीत. आपल्या धर्माबद्दल ज्यावेळी असा विचार करतो त्यावेळी या धर्माचा प्रारंभ कोणी केला, अथवा प्रारंभ कधी झाला याचा थांगपत्ता लागत नाही. कारण या धर्माची स्थापना कोणीही केलेली नाही. हा शाश्वत स्वरूपाचा धर्म कधी अस्तित्वात आला हेही सांगता येत नाही. कालगणनेच्या पलीकडे जे असते त्याला सनातन म्हणतात. म्हणून आपण आपल्या धर्माला सनातन धर्म असे म्हणतो.

जगातील इतर प्रचलित धर्म त्या मानाने अलिकडचे आहेत. कोणातरी प्रेषिताने वा कोणी तरी त्याची स्थापना केलेली आहे. हा सनातन धर्मातला आणि इतर प्राचीन धर्मातला महत्त्वाचा फरक आहे. सनातन धर्म शाश्वत असून तो ज्ञानावर आधारित आहे. हा धर्म सर्व प्रथम आर्य लोकांत प्रस्थापित झाला. आर्य याचा अर्थ सज्जनता. आर्य हे स्वभावाने उमदे आणि दिसावयास सुंदर होते अशी जागतिक इतिहासात यांची प्रतिमा उमटलेली आहे. आर्य प्रथम ज्या भूभागात राहिले त्याला आर्यावर्त असे नाव पडले. पुढील काळात या सनातन धर्मालाच, हिंदुधर्म असे ओळखले जाऊ लागले. काही लोक सिंधु नदीवरून हिंदु शद्ब आला असावा असे म्हणतात. तर अन्य काही हा सामासिक शब्द असावा असे मानतात. 'ह् + इन्दु' पूर्वी भारतात सूर्यवंशी आणि चंद्रवंशीराजे राज्य करीत होते. संस्कृत भाषेत सूर्याला 'ह' म्हणतात व चंद्राला 'इन्दु' म्हणतात. दोन्ही मिळून 'हिन्दु' हा सामासिक शब्द तयार होतो. म्हणजे 'हिन्दु' हा राजवाचक शब्द असून तो धर्म वाचक नाही असेही म्हणतात.

हा प्राचीनतम आणि जिवंत धर्म आहे. या धर्माने चिरंतन सत्याचा आविष्कार केला आहे. या सनातन धर्मालाच वैदिक धर्म असे म्हणतात. आजपावेतो जगातील इतर प्रचलित कोणत्याही धर्माने या सनातन धर्माइतकी मोठी माणसे निर्माण केलेली नाहीत. या धर्माने फार मोठे मार्गदर्शक, तत्त्ववेत्ते, थोर लेखक, महान् ऋषी, श्रेष्ठ राजे, बलाढ्य योध्दे, महान संत, थोर मुत्सद्दी, मोठे दयाळू, थोर देशभक्त इत्यादी निर्माण केलेले आहेत. या धर्माबद्दल जेवढे समजून घ्यावे तेवढा या धर्माबद्दलचा आपला आदर दुणावेल. धर्माची महती ध्यानात येईल. तो आपल्याला आवडू लागेल. धर्माशी सुसंबद्ध जीवन ज्यांनी घडविले त्यांना या धर्माचा मोठेपणा अनुभवता आला आहे. जे तसेच राहिले त्यांना मोठेपणा ध्यानात आलेला नाही. कारण धर्म आचरणाने निर्माण होते आचार: प्रभव: धर्म:।

**धर्मासंबंधी विविध व्याख्या :**

धर्माची व्याख्या अनेक प्रकारे करण्यात आलेली आहे. 'अभ्युदय व निश्रेयस' साधून देतो तो धर्म. 'योवना लक्षणो धर्म:'। कार्याला प्रवृत्त करतो तो धर्म. धारणात्

धर्म मि त्याहु: धर्मों धारयते प्रजा:। धारणा ज्या गोष्टीमुळे होते तो धर्म. धारणा म्हणजे नेमके काय? याचा विचार झाला पाहिजे. अव्यक्तातून व्यक्त दशेला येणारे विश्व पुन: अव्यक्ताकडे होणारा त्याचा प्रवास या व्यापारात असलेली धारणा त्याला धर्म असे नाव आहे आणि हा धर्म प्रजा: म्हणजे जे जे व्यक्त दशेला आलेले आहे त्याची धारणा करतो म्हणून असे म्हटले जाते की धर्मो रक्षति रक्षत:। धर्म पालन व्हावे म्हणून जो व्यवहार करतो त्याचे पालन धर्म करतो. थोडक्यात धर्म आचरणावरच अवलंबून आहे.

**सनातन धर्माचा पाया :**

हा सनातन धर्म ज्ञानाच्या फार मोठ्या भक्कम पायावर मजबूतपणे उभा आहे. या मजबूत पायावर धारणेची इमारत उभी करण्यात आलेली आहे.

***अ) श्रुती –*** वेद हा या धर्माचा पाया आहे आणि स्मृती या इमारतीच्या मजबूत भिंती आहेत. प्रत्यक्ष परमात्याचा विश्वास जे वेद ते महत् ऋषीनी ऐकिले (ईश्वरस्य निश्वसितं यत् वेद:।) आणि प्राप्त झालेले मंत्र समूह एकत्र केले. यालाच श्रुती असे म्हणतात. हे दैवी मंत्र समूह सुरुवातीला लिखित नव्हते. गुरु-शिष्य परंपरेने हजारो वर्षे मौखिक पद्धतीने याचे जतन करण्यात आले. अशा पद्धतीने आज पावेतो हे ज्ञान भांडार जिवंत ठेवण्यात आलेले आहे. आज सर्व वेद लिखित आहेत. मात्र त्याची जपणूक सांप्रत होत नाही, ही खेदाची गोष्ट आहे. हा आपला सांस्कृतिक ठेवा आहे.हे कदापि विसरून चालणार नाही.

***ब) स्मृतिग्रंथ –*** स्मृतिग्रंथ म्हणजे धर्म शास्त्रे. ही श्रुतीच्या खालोखाल प्रमाणित मानली गेली आहेत. स्मृतिग्रंथ अनेक आहेत. त्यापैकी चार स्मृति या अतिश्रेष्ठ व्यक्तींनी लिहिलेल्या आहेत. त्याचाच पाठपुरावा आजतागायत करण्यात येत असतो. स्मृतिग्रंथात मुख्य गोष्ट कोणती असेल तर कर्तव्य पालन, त्यासाठी नियमावली, त्याच प्रमाणे व्यक्ती कुटुंब, सामाजिक व राष्ट्रीय जीवन, याची घडण सुयोग्य होण्यासाठी आचार पद्धती व त्याप्रमाणे वागावयास हवे असा दंडक आदी गोष्टींचा समावेश केलेला आहे. आपले जीवन आचार स्मृतीने घडविले आहे. १) मनुस्मृती याला मानव धर्म शास्त्र असेही म्हणतात. २) याज्ञवलक्य स्मृती ३) शंख स्मृती ४) पाराशर स्मृती. मनु हा मोठा कायदे पंडित मानला जातो. त्यांनी आर्य लोकांचे जीवन घडविले. सनातन पद्धतीप्रमाणे कालगणनेचे सात टप्पे व सात युग कल्पिले गेले. युग हा एक मोठा कालखंड आहे. प्रत्येक कालखंडाचा आरंभ एका मनूने होतो. व त्याच मनूबरोबर तो कालखंड संपतो, त्यालाच मन्वंन्तर असे म्हणतात. मनू हे मोठ्या मनाचे व तेजस्वी आहेत आणि हे सातही मनु स्वायंभुवाचे पुत्र आहेत. सध्याच्या मनूचे नाव वैवस्वत आहे. या मनूला अनुसरून इतर स्मृती आहेत. काळानुसार पुढील स्मृतीत फेरफार आढळतो.

***क) इतिहास व पुराणे –*** या धर्माला आधारभूत आणखी दोन महत्त्वाची अंगे आहेत. ती म्हणजे इतिहास व पुराणे. पुराणांतून विविध प्रकारच्या कथांच्याद्वारे आपला प्राचीन इतिहास व धर्माचरणासंबंधी भरपूर माहिती आढळते. सामान्य माणसाचे धार्मिक जीवन पुराणे व त्यांतील गोष्टींच्या श्रवणाने घडत जाते. ठिकठिकाणच्या स्थळांची, तीर्थांची, देवतांची, तसेच व्रत वैकल्यादी आचरणांची, विविध माहिती, सामान्यजनापर्यंत पोचवण्याचे कार्य या पुराण ग्रंथाने केलेले आहे. दोन ऐतिहासिक महाकाव्ये - रामायण व महाभारत यातूनही जनसामान्यांना योग्य तो बोध होतो. रामायणात दशरथपुत्र श्रीराम याचे चरित्र आहे. त्याने आपले संपूर्ण जीवन कर्तव्याचरणात घालविले आणि एक तेजस्वी, आदर्श व अनुकरणीय असे चरित्र घडविले. आदिकवि वाल्मिकी याने अत्यंत सुबोध रीतीने याची रचना केली आहे. महर्षी व्यासांनी महाभारत हा ग्रंथ लिहिला यात कौरव कुळांचा इतिहास आहे. हस्तिनापूर ही त्यांची राजधानी. दोन चुलत

भावामध्ये राज्यविषयक मोठे भांडण झाले. त्यातून मोठा संग्राम झाला याची माहिती या ग्रंथात आहे. शिवाय हा ग्रंथ म्हणजे ज्ञानाची खाण आहे. यात राजनिती, तत्त्वज्ञान, राजधर्म, सामान्यधर्म इत्यादी अनेक विषय आलेले आहेत. या दोनही महाकाव्यातून आपल्या प्राचीन कालीन धर्माचा, सांस्कृतिक जीवनाचा, तात्विक विचारांचा चांगला बोध होतो. महाभारताइतका मोठा ग्रंथ संपूर्ण जगात नाही.

***ड) शास्त्रीय वाङमय –*** सनातन धर्माने शास्त्राला प्रोत्साहन दिले. त्यामुळे शास्त्रीय वाङमय निर्माण झाले. धर्म आणि भौतिक शास्त्रे अशी फारकत त्यावेळी झालेली नव्हती. या शास्त्रात व्याकरण, व्युत्पत्ती, खगोल, काव्य, कला आणि चौसष्ट विविध विद्या यांचा समावेश झालेला आहे. या सर्व अंगांचा साकल्याने अभ्यास करणाऱ्या व्यक्तीला पंडित असे म्हणत. त्याला समाजात विशेष प्रकारचे स्थान प्राप्त होत असे. तत्त्वज्ञान विषयातही षट् दर्शने आढळतात. या सर्व दर्शनांचा दृष्टिकोन एकच आहे. तो म्हणजे आत्यंतिक दु:ख निवृत्ती व परमानंद प्राप्ती. परमतत्त्वापासून जीवतत्त्वाची जी फारकत झालेली आहे ती पुनरपि प्रस्थापित करणे हा भाग जीवनात अति महत्त्वाचा मानला गेला त्यासाठी ज्ञानाची आवश्यकता प्रतिपादली गेली. सर्वांनाच ज्ञानाचा लाभ व्हावा या कल्पनेतून निरनिराळ्या दर्शनांची आवश्यकता भासू लागली. न्याय वैशेषिक, सांख्य योग, मीमांसा आणि वेदान्त ही दर्शने उदयाला आली यावरून सनातन धर्माची वैचारिक बैठक किती भक्कम व प्रचंड आहे याची कल्पना येते.

**पुनर्जन्म कल्पना :**

जीवाच्या उत्क्रांतीसाठी होणारा प्रवास अखंड चालू आहे. ह्या प्रवासात जीवाला अनेक शरीरे धारण करावी लागतात. जीवनत्व विकसित होत जाते तसे त्याचे शरीरही बदलत जाते. यालाच पुनर्जन्म, दुसरे शरीर धारण करणे असे म्हणतात. जीव हा व्यापक तत्त्वाचा ब्रह्माचा अंश आहे. 'ममैवांशो जीवलोके जीवभूत: सनातन:।' (गीता). झाडाहून बीज वेगळे आहे. तसेच परमात्म्याहून जीवात्मा वेगळा आहे. झाड बीजाला निर्माण करते. त्याला पूर्वीचे रूप देते. ते बीज पृथ्वीवर पडते मग बीज हळू हळू वाढू लागते. म्हणजे आपल्या आतील शक्ती अभिव्यक्त करते आणि हळू हळू ते रोपटे, झुडूप, छोटे झाड व मोठा वृक्ष बनते व आपल्या पित्यासारखे रूप धारण करते. ते दुसरे काही बनू शकणार नाही. कारण त्याची प्रकृती तशी आहे. ते जन्मदात्या सारखेच होणार हाच प्रकार जीवाच्या बाबतीतही संभवतो. बीजा सारखाच जीवही प्रकृतीत फेकला जातो. 'मम योनि: महत् ब्रह्म अस्मिन् गर्भं दधाम्यहम्। अहंबीज प्रद:पिता।' (गीता). मी प्रकृतीत बीज पेरणारा पिता आहे. इथे ईश्वर हा पिता आहे. जीव विकसित होऊ लागतो. आपल्या आतील शक्ति विकसित करू लागतो आणि शेवटी तो ईश्वर होतो. ईश्वराशिवाय तो दुसरा कोणी होणार नाही. कारण पितृस्थानी असलेल्या ईश्वराचा स्वभाव जीवात आहे. ईश्वरापासून निर्माण झालेले बीज पुनरपि ईश्वर रूपातच परिणत होते. यासाठी जीवाला अनेक योनींतून प्रवास करावा लागतो व त्या त्या योनीला साजेशी शरीरे धरण करावी लागतात. ईश्वर होईपर्यंत हा जीवाचा प्रवास अखंड चालू राहतो.

**कर्म सिद्धान्त :**

गरजेलाच वासना म्हणतात. काही तरी प्राप्त करून घेण्यासाठी मानव इच्छा करतो हे मानवी कर्माचे बीज आहे. तो क्रम असा. प्रथम प्राप्त करण्याची इच्छा, मग प्राप्त करण्याचा विचार, आणि प्राप्त करण्यासाठी होणारा प्रयत्न वा कर्म ही तिसरी अवस्था होय. प्रत्येक क्रियेमागे विचार, प्रत्येक विचारामागे वासना अगर इच्छा असते.

विचार, वासना आणि प्रयत्न या तीन गोष्टी म्हणजे तीन धागे आहेत. या तीन धाग्यांच्या गुंफणीने निर्माण होणारी गोष्ट म्हणजे कर्म होय. कर्मामुळे माणूस सुखी वा दु:खी होतो. कर्माच्या मागे जो विचार असतो तोच मनुष्याचे शील बनवितो; म्हणजेच मन घडवितो. आपण जसा विचार करू तसे आपण होऊ. आमचे घडणे आमच्या विचाराशी अनुरूप असते. या विचारामागे वासना असतात. या वासना आपल्या इच्छित वस्तू प्राप्त करून देण्यासाठी असतात. लोहचुंबक लोखंडाच्या कणांना आपल्याकडे खेचतो त्याप्रमाणे या वासना खेचतात. वासनेमुळे इष्ट वस्तू खेचल्या जातात. आपणास पैसे मिळविण्याची इच्छा झाली तर आपण श्रीमंत होण्याच्या विचाराने भारले जाऊन तसा प्रयत्न करू व श्रीमंत होऊ शकू. असे होणारे प्रयत्न हे ही 'कर्मच' होय. कर्माची व्याख्या एका वाक्यात करावयाची झाल्यास मानव जे पेरतो ते उगवते. याचाच अर्थ माणसाला जे उगवावे असे वाटते तेच तो पेरतो. हाच कर्म सिद्धांत होय.

**यज्ञ संकल्पना :**

सृष्टिचक्र हे परस्परांच्या त्यागावर आधारित असून धन, ऐहिक ऐश्वर्य एवढेच नव्हे प्रसंगी स्वत:च्या प्राणाचेही बलिदान समाजाच्या कल्याणासाठी केले पाहिजे असा संकेत पाळला जात असे. यज्ञाहुतीने सूर्यास नव चैतन्य प्राप्त होते. तो पर्जन्यवृष्टी करतो, पर्जन्याने अन्ननिर्मिती होते अन्नाने प्राणी निर्माण होतात. अन्नाने त्या सर्वांचे पोषण होते. असा यज्ञ व लोकजीवन यांचा परस्पर संबंध प्रस्थापित झाला. हाच प्रथमचा धर्म. तानि धर्माणि प्रथमानि आसन्। (पु. सूक्त.) अग्नौप्रास्ताहुतिंहुत्वा आदित्यं उपतिष्ठते। आदित्यात् जायते वृष्टि: ततो अन्नम् तत: प्रजल:।

दुसऱ्याच्या कल्याणासाठी आपला जीव ओतणे याचे नाव यज्ञ. मानवाने हे आपले कर्तव्य मानावे आणि सेवा म्हणजेच आनंद, तेच अंतिम फलित आणि श्रेष्ठ पारितोषिक असे समजावे. संपूर्ण जीवनच परस्परांवर अवलंबून आहे आणि हे जाणल्यासच एकमेकांबद्दल प्रेमभाव निर्माण होईल, तरच मानवाचे जीवन सुसह्य होऊ शकेल. हीच उन्नती. कर्तव्यपालन म्हणजे यज्ञच होय. कर्तव्य पूर्तीसाठी यज्ञ आचरण अत्यंत आवश्यक आहे.

एखाद्या वस्तूचे वा प्राण्याचे अधिक चांगल्या वस्तूत वा प्राण्यात रूपांतर होते तेव्हा ती आत्मसमर्पण भूमिकाच धारण करत असते. अंडे स्वत:चे आत्मार्पण करून पिलाला जन्माला घालते, बीज आत्मार्पण करून वृक्षाला जन्माला घालते हा त्या अंड्याचा आणि बीजाचा आत्मयज्ञ आहे. संपूर्ण विश्व निर्मितीसाठी विराट पुरुषाने आत्मयज्ञ केले. याला पुरुष यज्ञ म्हणतात. मानवी सृष्टीतही हेच आढळते. माता पिता मूल जन्माला घालतात. पालन पोषण करतात व त्याला समर्थ करून स्वत:च्या पायावर उभे करून देतात. तसेच गुरू शिष्याला आपल्या ठिकाणी असलेले ज्ञान देतो त्याला विद्यावंत करतो. याही गोष्टी यज्ञातच मोडतात. अशा प्रकारे हा सृष्टिचक्राचा यज्ञ अखंड चालू आहे. असे घडत असताना वा करत असताना 'इदं न मम' या भावनेने त्यावरील हक्क मानव सोडून देतो. उदात्त कर्माच्या मागे या यज्ञ संकल्पनेची विशालता दडलेली आहे. हेच यज्ञाचे विशाल तत्त्वज्ञान. त्याग, संयम, पवित्रता आदी मूल्ये या साऱ्यांची जोपासना अक्षुण्णपणे या यज्ञ संकल्पनेत अभिप्रेत आहे. संपूर्ण जीवनच यज्ञमय करण्याची प्रक्रिया यामुळे आजतागायत टिकून राहिली आहे. यासाठी यज्ञ संकल्पनेचा पाठपुरावा करणे अगत्याचे आहे. यज्ञ स्वरूपात केलेले कर्म मानवाला सुविचारी बनविते. त्याचे अंत:करण शुद्ध करते. म्हणूनच त्याच्या हातून सदाचार घडतो. सदाचाराने मानव स्वत:चे व इतरांचेही जीवन खऱ्या अर्थाने सुखी व संपन्न करू शकतो, फुलवू शकतो. हेच खरे यज्ञ रहस्य हे रहस्य वैदिक ऋषींनी जाणले. हे वैदिक संस्कृतीचे एक वैशिष्ट्यपूर्ण

जीवन आहे. या यज्ञ संकल्पनेलाच वैदिक ऋषी धर्म म्हणत आणि कसोशीने या धर्माचे आचरण करीत.

थोडक्यात उत्क्रांत होण्यासाठी, परस्पर प्रेमभाव वृद्धिंगत करण्यासाठी आणि कर्तव्यपूर्तीसाठी यज्ञ आवश्यक आहे अशी जाण मानवाला ज्या प्रमाणत येऊ लागेल, त्या प्रमाणात त्याला आपले खरे स्वरूप ध्यानात येण्यास सुरुवात होईल. मग यज्ञ करण्यात त्याला एक प्रकारचा आनंद होईल. इतरांच्या कल्याणासाठी स्वत:चा जीव ओतणे हे आल्हाददायक असते. त्यात आत्मानंद असतो. आत्मिक शक्तीचा तो आविष्कार असतो. माणसाचे प्रथम कर्तव्य इतरांसाठी जगणे हेच असू शकते. कारण आपले मूळस्थान जो परमात्मा तो सर्वासाठी जगतो. जिथून परमात्म्याची शक्ती प्रवाहित होत आहे तिथूनच त्याचे साधन बनून जाणे यात मानवाला खरा आनंद प्राप्त होतो आणि असे वागणे याचे नाव यज्ञ होय. यज्ञ जीवनात इतका आवश्यक असल्याचे ध्यानात आल्याने त्याचा पुरस्कार दैनंदिन जीवनात करण्याचे आपल्या ऋषींनी ठरविले आणि त्यातून पंचमहायज्ञाची कल्पना साकार झाली.

दैनंदिन जीवनात या यज्ञाचे आचरण होणे आवश्यक आहे असा दंडक घातला. मानवी व्यवहार सुरळीतपणे चालावेत, मानवाला इहलोकी सुखी व समाधानी जीवन जगता यावे, समाज हा व्यक्तीशी सुदृढ प्रेम-बंधनाने एकत्र बांधला जावा व प्रत्येक व्यक्ती ही दुसऱ्यावर अवलंबून असून एकमेकांचे जीवन सुखी करण्याची परस्पराने प्रेमानेच वागले पाहिजे हा जीवन विषयक एक अत्यंत मोलाच सिद्धांत आचरणात आणण्याचे महान् कार्य या पंचमहायज्ञातून घडवून आणले.

**पंचमहायज्ञ :**

ही पंचमहायज्ञे प्रत्येक दिवशी केलीच पाहिजेत. देव, ऋषी, पितर, मनुष्य आणि भूतमात्रे या सर्वांच्या सहकार्याने या विश्वातील जीवन सुरळीत चालते. या यज्ञाचे शास्त्रीय व धार्मिक असे दोन भाग संभवतात. यज्ञाचा बाह्य आचार हा धार्मिक स्वरूपाचा आहे. आंतरिक विचार शास्त्रीय आहे. बाह्य आचार व आंतरिक विचार या दोहोंचा बोध असणे आवश्यक तरच हा यज्ञ का करावा हे ध्यानात येईल.



***देवयज्ञ –*** या यज्ञाचे बाह्यांग - होम, हवन, देवतेला उद्देशून अर्पण करणे इत्यादी. यातील रहस्य देवतांकडून आपल्याला सर्वच गोष्टी मिळत असल्याने त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे, उतराई होणे, तसेच श्रेष्ठ लोकांशी चांगले संबंध प्रस्थापित करणे, परस्परांचे जीवन एकमेकाशी निगडित आहे हे ओळखून निसर्गाशी देखील प्रेमपूर्ण व्यवहार करणे.

***ऋषियज्ञ –*** बाह्यांग - अध्ययन, अध्यापन, नित्यवेद, वेदांग यांचे पठन. ज्ञान प्राप्ती हे आपले कर्तव्य मानणे. अंतरभाव - सर्वच गोष्टी ज्ञानात परिणत होतात हे ओळखून लोकांना ज्ञानी करावे. जे आपणासि ठावे। ते इतरांसी शिकवावे। शहाणे करून सोडावे। सकळ जन। (रामदास) स्व विषयक जाण करून घेणे व इतरांत ती निर्माण करणे हा श्रेष्ठ प्रकारचा यज्ञ होय.

***पितृयज्ञ –*** बाह्यांग - अन्न उदक पितरांना उद्देशून देणे, पितरांच्या नावे नित्य तर्पण करणे. आंतरिकभाव - पितरांचे ऋण मान्य करणे. मागील पिढीचे उपकार स्मरणे. आपण त्यांचे ऋणी आहोत ही भावना नित्य बाळगणे. हे सारे वैभव कष्ट पूर्वक निर्माण केले व आपणापर्यंत पोचविण्याची जबाबदारी समर्थपणे पार पाडली याची जाण ठेवणे अन्यथा

आपण कृतघ्न ठरू. आपणांस इतिहास विसरून चालणार नाही. तसे घडल्यास आपण माणुसकीस पारखे होऊ. भव्य भूतकाळाचे ज्ञान ठेवणे अत्यंत आवश्यक. यासाठीच रामदास स्वामींनी संभाजी महाराजाना उपदेश करते वेळी म्हटले – श्रेष्ठी जे जे मिळविले। त्यासाठी भांडत बैसले। मग जाणावे फावले। गनीमासी। शिवरायाचे आठवावे रूप। शिवरायाचा आठवावा प्रताप। शिवरायाचा आठवावा साक्षेप। भू मंडळी।

***मानव यज्ञ –*** बाह्यांग – पाहुण्यांचे, अतिथींचे आदरतिथ्य करणे. गरजूंना अन्न वस्त्र आदींनी मदत करणे. अपंगाना निराश्रिताना थारा देणे, त्यांचे जीवन उभे करणे इत्यादी. आंतरिकभाव – कर्तव्य पालन, माणुसकीच्या नात्याने आपण बांधले गेलो आहोत याची जाणीव ठेवणे आणि सर्वांशी प्रेमानेव सहानुभूतीपूर्ण वर्तन करणे. साऱ्यांनाच ईश्वर स्वरूप मानून सेवा करणे हे या यज्ञातील वैशिष्ट्य होय.

***भूतयज्ञ –*** अगदी क्षुद्र किडा, मुंगी इत्यादींना देखील आपल्या भोजनापूर्वी अन्न अर्पण करणे. पृथ्वीवरील भूतमात्रासाठी अन्न बाजूला काढून ठेवणे. काकबळी, गोग्रास या निमित्ताने हे घडत असे. तसेच पशुपक्ष्यादींना धान्य खावयास घालणे. मुंगीला साखर घालणे आदी गोष्टी भूत यज्ञात मोडतात. आंतरिकभाव – सर्व क्षुद्र योनी बद्दल मनात आदर भाव बाळगणे. त्यांचीही मदत अप्रत्यक्षपणे घेत असतो याची जाणीव ठेवणे. निसर्ग तसेच पशुपक्षी यांना तुच्छ लेखून उगाच नायनाट न करणे.

पंचमहायज्ञांतून माणूस अनेक गोष्टी शिकतो. आपल्याहून श्रेष्ठ, आपल्या बरोबरीचे व आपल्याहून कनिष्ठ यांच्याशी आपले वर्तन कसे असावे, या सर्वांशी संतुलन कसे राखावे, आपले आणि इतरांचे सुख समाधान, प्रगती आदि कशी साधावी या गोष्टीकडे लक्ष वेधले जाते. आपण या विश्वात एकाकी नाही. या महान् संसार सागरातील आपण एक बिंदु आहोत मोठ्या शरीरातील एक अवयव आहोत. अवयावाचे सुख समाधान संपूर्ण शरीराशी निगडित म्हणजेच सर्व घटकांशी संबधित. सर्वांच्या सुखात आपले सुख सामावलेले आहे. सर्वच सुखी असल्यास आपण सुखी होऊ ही भावना उदित होण्यास या पंचमहायज्ञाने मदत होते. मानवाचे नित्याचे जीवन कसे घालवावे याचा धडा मिळतो. परस्परांशी आपले जीवन निगडित आहे हे ओळखून कर्तव्य बुद्धीने व्यवहार करावा ही महत्त्वाची शिकवण आपल्या धर्माने पंचमहायज्ञाच्या पूर्तीचा, सहानुभूतीचा आणि प्रेमपूर्णतेचा असा आहे. असा नित्य व्यवहार व्हावा या भूमिकेतून यज्ञ संकल्पना राबविली जात असे. यज्ञाचे एकच अंग हवन आपणास परिचित आहे. यज्ञाचे अंतरंगातील भाव ओळखून मानवी व्यवहार होणे आवश्यक आहे.

**शुद्धता :**

शरीर आणि मन निकोप व निरोगी ठेवण्यासाठी पाळण्यात येणारे नियम. याने शरीर स्वच्छ राहते. निरोगी राहते आणि मजबूत राहते. रुग्णाइत असणे याचाच अर्थ निसर्गातील कोणत्या तरी नियमाचे यथायोग्य पालन केले जात नसणे वा दुर्लक्ष होत असणे होय. निसर्गाचे नियम हे ईश्वरीय नियम आहेत व ते अनुलंघनीय आहेत. हे ओळखून त्यांचे योग्य पालन केले जावे म्हणूनच धर्मात समाविष्ट करण्यात आल्या आहेत. यामुळे सामान्य जनांनाही आचरण करणे सुलभ झाले आहे. अन्न, पाणी, हवा या तीन गोष्टींवर आपला अन्नमय व प्राणमय कोष अवलंबून असल्याने शरीर शुद्धार्थ, व प्राण शुद्धार्थ यातील प्रत्येक गोष्ट शुद्ध स्वरूपात स्वीकारणे आवश्यक आहे. अन्न ताजे असावे तरच ते शुद्ध व जास्त पोषक असते. ताजी फळे, भाजी, पालेभाजी, ताजे कंद या सर्वांमधे जास्त प्रमाणात जीवनसत्त्वे असतात म्हणून शुद्ध आहार हितावह. तसेच शुद्ध पान यासाठी पाणी उत्तम मात्र ते जिवंत स्वरूपात असावे. द्रव पदार्थापैकी दूध हे अन्न व

पेयही आहे. मादक पेय घातक. मेंदूला ही पेये विषारी आहेत. शिवाय यकृतात बिघाड निर्माण करतात. शुद्ध हवा आरोग्यासाठी आवश्यक. कोंदट, कुबट, हवेत राहणारा माणूस लवकर रुग्णाइत होतो. अशावेळी शुद्ध हवेसाठी यात्रा करणे आवश्यक. चारधाम यात्रेमुळे शुद्ध हवेबरोबरच मनही पवित्र होते. मन आणि शरीर शुद्धतेबरोबरच वाणीची शुद्धताही आवश्यक. ही शुद्धता पाळली गेल्यास जीवनाला एक वेगळेच वळण मिळते. निंदा कुटाळकी, दुरावा, भांडण लावणे ही सारी वाणी अशुद्धतेची लक्षणे आहेत. ही टाळता येण्यासारखी आहेत. काया, वाचा, मन ही शुद्ध झाल्यासच मानवाच्या ठिकाणी पावित्र्य उदयाला येते. तरच त्याचे मन उदात्ततेकडे वळू शकते. श्रेष्ठ जीवन घडवावे, ईश्वर सान्निध लाभावे असे त्याला वाटू लागते. शुद्धता ही देवाकडे नेणारी एक साधना आहे. शुद्धतेने देवपूजा योग्य प्रकारे घडते.

देवपूजा म्हणजे प्रेमभाव व्यक्त करणे. श्रेष्ठत्व मान्य करणे. ईश्वराबद्दल अंत:करणांत आवड निर्माण होणे. एकत्वाचा अनुभव घेणे. मनाची विकसित अवस्था साधणे. या साऱ्या गोष्टी पूजनाने साध्य होतात. ईश्वर सर्वांच्या अंत:करणात वास करून असतो. त्यालाच शरण जाणे हे श्रेयस्कर. त्याच्या प्रसादाने सर्व श्रेष्ठ प्रकारची शांती व प्रसन्नता प्राप्त होते. सर्व मानव कळत न कळत परमेश्वराकडेच जात असतात. ही एक सत्य घटना आहे. ममवर्त्म अनुवर्तंते मनुष्या: पार्थ सर्वश: । (गीता-४-११) यालाच पूजा असे नाव आहे. परमेश्वराच्या दिशेने होणाऱ्या वाटचालीला पूजा हे सार्थ नाव आहे.

**व्यक्ती विकास - सामाजिक संतुलन :**

आचारहीनता निर्माण होऊ नये. लोक आळशी, अनभिज्ञ आणि आपमतलबी होऊ नयेत, आपआपल्या व्यवहारात कुशलता प्राप्त करून घेण्याची संधी प्रत्येकाला प्राप्त व्हावी यासाठी प्रयत्न करणे जरूरीचे आहे. तरच मानवात उत्कृष्ट गुण निर्माण होतील आणि ते गुण एकमेकांना पूरक होतील. हे झाल्यास समाज पुरुष हा सुस्थितीत राहू शकेल. यासाठी प्रत्येकाला त्याच्या आवडीप्रमाणे, प्रवृत्तीप्रमाणे काम करण्याची संधी मिळाली पाहिजे. त्यामुळे त्याचे व्यक्तिमत्त्व विकसित होईल व त्याच्या गुणांना भरपूर वाव मिळेल. तरच त्याच्या व्यवहारांतून समाजाचा पर्यायाने राष्ट्राचा फायदा होईल. अशा रीतीने समाजात ज्ञानवंत, प्रज्ञावंत, यशवंत, बलवंत, धनवंत, शीलवंत, उत्तम कारागीर आदि मानव समूह सतत निर्माण होतील. त्यांच्यामधे परस्पर सलोख्याचे आणि प्रेमाचे संबंध दृढ होतील असे पाहणे आवश्यक आहे. उद्योगाशिवाय तरणोपाय नाही. कोणालाच कोणतीही गोष्ट आपोआप प्राप्त होत नाही. त्यासाठी सतत कार्यशीलच राहिले पाहिजे. अथक परिश्रम करणेच आवश्यक आहे अशा सर्वक्षेत्रात नित्यही योग्य माणसे निर्माण होणे आवश्यक आहे. ती कशी निर्माण करता येतील हा विचार ऋषींनी प्रामुख्याने केला होता. मानवाला स्वत:ची प्रगती व विकास या दोनही गोष्टी साधता आल्या पाहिजेत, तेव्हाच विकसित व्यक्तिमत्त्वाचा फायदा समाजाला मिळेल आणि त्या समाजाला हितावह व पोषक होतील. तरच समाजरचना चिरकाल टिकू शकेल. मानव व्यक्ती व समाज या दृष्टीने उन्नत होऊ शकेल. पूर्वकाळी ऋषींनी विचारपूर्वक वर्ण आणि आश्रम पद्धतीने हे साधले होते. सांप्रत काळी कोणती पद्धत स्वीकारावी म्हणजे विकासाबरोबरच सामाजिक सुस्थिरताही साधता येईल, हे आधुनिक विचारवंतानी ठरवावे.

**सद्‌गुणांचा पाया :**

आपल्यावर अनेकांची ऋणे आहेत. ती फेडणे हे आपले प्रथम कर्तव्य आहे असे समजून व्यवहार करणे हा सद्‌गुणांचा पाया आहे. कर्तव्य पालन म्हणजेच सद्‌गुणांची जोपासना होऊ शकते. सद्‌गुणी माणूस आपले कर्तव्य जाणतो आणि ती पार पाडतो. भीष्म पितामह म्हणतात

– सद्‌गुण म्हणजे सत्याचा आविष्कार होय. सत्य हे शाश्वत ब्रह्म आहे. सत्याचे आचरण हे दैवी आहे आणि ते ब्रह्मात स्पष्टपणे अभिव्यक्त होते. निसर्गातील सारे नियम या सत्यावर आधारित आहेत. त्या नियमांचे काटेकोर पालन होते. त्यात कोणताही बदल संभवत नाही. सर्वात श्रेष्ठ सत्य नानात्वात एकत्व अनुभविणे हेच असू शकते. कर्तव्य पालन जो करीत नाही तो व्यर्थ जगतो. तो पापी जीवन जगतो. 'अघायु: इंद्रियाराम: मोघं पार्थ स जीवति। गीता. नीति वा संयम हाच सद्‌गुणाचा पाया आहे. प्रत्येकाने आपण स्वत:ला जसे समजतो तसे इतरांना समजावे 'आत्मवत्‌ सर्वभूतेषु।' हे नीतिशास्त्रातील सत्य आहे. हेच त्या शास्त्रातील रहस्यही आहे. इतरांशी असभ्य, असत्य वर्तन करणे म्हणजेच आपण इतरांनाही आपल्या सारखेच आहेत असे समजत नाही असेच म्हणावे लागेल. यातूनच पापाचरण घडते. सत्यच आपल्या साऱ्या नीतिशास्त्राचा आधार आहे. यामुळेच आत्मतत्वाचा म्हणजेच एकत्वाचा अनुभव प्राप्त होतो. इंद्रियातच सुखलोलुप होणाऱ्या माणसाची काय अवस्था होते याची अनेक उदाहरणे देता येतील. या बाबतीत ययातीचे एकच उदाहरण आठवावे. थोडक्यात संयमाने वागल्यासच खरा आनंद प्राप्त होतो. स्वैर उपभोगाने नव्हे ही शिकवण या गोष्टीतून मिळते. आपले आचरण स्वैर असू नये असे म्हटले जाते यालाच नीती म्हणतात.

संयम हाच सद्‌गुणाचा पाया. मन, वाणी, शरीर यांच्यावर ताबा प्राप्त झाल्याने सदाचार संपन्नता प्राप्त होते. असा मानव आपल्या भावना, आपले मन, आपले शरीर याचे नियमन करून व्यवहार करतो. याला आत्म संयमन असे म्हणतात. व्यवहार तीन प्रकारे संभवतो – १. आपल्याहून वरिष्ठ २. आपल्या बरोबरीचे ३. आपल्याहून कनिष्ठ यांच्याशी होणाऱ्या व्यवहारातून चांगले व वाईट याची नोंद घेता येते. चांगले वा वाईट याबद्दल निश्चित निर्णय करणे कठीण. कोणतीही कृती अशी असावी जेणे करून स्वत:चे कल्याण व इतरांचे हित साधले जाईल. ही गोष्ट सदाचारावर अवलंबून असते. यालाच निवृत्ती मार्ग म्हणतात. हा मार्ग एकत्वाकडे नेतो. अलगपणा निर्माण होऊ नये याकडे विशेष लक्ष पुरविले पाहिजे. एकत्वाकडे जाण्याचा सतत पुरस्कार केला पाहिजे.

**सद्‌गुण व सदाचार :**

निर्हेतुक प्रेम हे सर्व सद्‌गुणांचे माहेरघर आहे. द्वेष बुद्धीमुळे अलगपणा वाढीला लागतो. प्रेमाने एकत्वाचा अनुभव घेता येतो आणि एकत्वाकडे नेणारी गोष्टच सद्‌गुण असू शकते. कारण ती सर्वांना हितावह असते. म्हणून प्रेमाचा व्यवहार सर्वश्रेष्ठ असू शकतो. प्रेम सज्जनतेचे मूळ. श्रेष्ठ पुरुषाशी अगर ईश्वराशी होणारा व्यवहार ही भक्ती, आदर, पूजन, शरणागती या भावानी ती युक्त असते. राष्ट्र–प्रेमामुळेच अनेक देशभक्तांनी धारातीर्थी आपले प्राणखर्ची घातले. अनेक क्रांतिकारक हसत हसत फासावर चढले. तसेच दैनंदिन जीवनात आज्ञापालन हा देखील प्रेमामुळेच होणारा व्यवहार आहे. काहीवेळा कर्तव्यबुद्धीने पण होतो. भीतीपोटी होणारे आज्ञापालन यात प्रेमाचा भाग नसतो. भीती नष्ट होताच आज्ञाभंग होतो. यात आज्ञा उल्लंघण्याची प्रेरणाही असते. बरोबरीच्या माणसाशी होणारा व्यवहार नित्य करावा लागत असल्याने महत्वाचा असतो. तो चांगला असणे आवश्यक. पति–पत्नीतील प्रेम, बंधुप्रेम, कुटुंबातील व्यक्ती विषयी प्रेम, मित्रप्रेम, देशबांधवाबद्दल प्रेम, या साऱ्या घटना प्रेममूलक असून अत्यंत स्नेहपूर्ण व सर्वाशी बरोबरीने घडतात. स्त्रीला गौरवानेच वागवावे असे मनू आवर्जून सांगतो. 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता:। यत्र एता: न पूज्यन्ते सर्वा: तत्र अफळा: क्रिया:।' याच प्रमाणे कनिष्ठाशीही प्रेमानेच वर्तन करावे अशी सनातन धर्माची शिकवण आहे. रुद्राध्याय शांती सूक्तात असे म्हटले आहे – मधु मनिष्ये। मधु जनिष्ये। मधु वक्ष्यामि। मधु वदिष्यामि। मधुर भाषण करीत, प्रेमळ वर्तन

करीत, प्रेमळपणा निर्माण करीत, यालाच धर्माचरण म्हणतात. हे साऱ्यांनाच आचरता येण्याजोगे आहे. अशा प्रकारे आपल्याहून श्रेष्ठ, आपल्याबरोबरीचे आणि आपल्याहून कनिष्ठ या सर्वाशी प्रेमानेच व्यवहार करावा ही धर्माची शिकवण आहे. द्वेष मूलक, वासना मूलक, आचरण करण्याने जीवन उध्वस्त होते हे लक्षात ठेवून सनातन धर्म-आचार-संहिते पासून आपली फारकत होणार नाही हे पाहाणे आवश्यक आहे.सनातन धर्म हा शाश्वत आहे. त्याचे पालन करण्याची संधी प्राप्त होणे हे ही आपले महत् भाग्य आहे.

मानवा मानवात फूट न पडता ज्या गोष्टीने एकोपा निर्माण होऊ शकतो ते सारे चांगले. याप्रमाणे नीतिशास्त्र सापेक्ष आहे. दया बुद्धी असणे, क्षमा करणे, हा संन्याशाचा नीतिधर्म असू शकतो. मात्र ती नीति राजाला अवलंबिता येणार नाही. 'यथापराध दण्डानाम्' हीच राजनीति असू शकते. याचे तारतम्य ओळखता आले पाहिजे. तरच योग क्षेत्र नीट चालू शकेल. तुकाराम महाराज म्हणतात – विंचू सर्प नारायण। दूरुनि करावे तया नमन। या नारायणाच्या रुपाला जवळ करता कामा नये हेच ते तारतम्य. मात्र एक सर्वसामान्य नियम असू शकतो. याज्ञवलक्य म्हणतात – यत् यत् आत्मनिच इच्छेत् तत् परस्थाऽपि चिंतयेत्। अत: यत् आत्मन: अपथ्यं तत् तत् परेषां न आचरेत्। (याज्ञवलक्य स्मृति) हेही वचन तारतम्यपूर्वकच स्वीकारावे. स्थळ, काळ, व्यावहारिक स्तर त्यातून निर्माण होणारा व्यवहार हा निर्हेतुक व हितावह असावा हे नीतिशास्त्राने आपल्या ध्यानात येते.

**आध्यात्मिक जीवन ही भारताची खरी शक्ती :**

प्रत्येक राष्ट्राची एक विशिष्ट घडण असते. ही घडणच त्याची खरी शक्ती असते. मानवी जीवन, त्या विषयी वाटणारे प्रेम हे त्या शक्तीचे एक प्रमुख अंग असते. भारत देशाचीही एक विशिष्ट घडण आहे. संपूर्ण जीवन व्यापून त्याला उन्नत करणारी आणि जोम व जिवंतपणा आणणारी महान् आध्यात्मिक विचार संपदा आणि त्याबद्दल अतूट श्रद्धा हीच भारताची खरी शक्ती आहे. किंबहुना भारताचे सारे अस्तित्वच यावर आधारित आहे. आजही भारत भौतिकवाद, साम्यवाद अशा पाश्चात्यांच्या प्रचंड दैवता समोर नतमस्तक होऊ इच्छित नाही. उलट असा विश्वास बाळगून आहे की एक दिवस असा निश्चित उगवेल 'पुनरपि भारत हा आपल्या आध्यात्मिक सामर्थ्यानिशी' जगाचे नेतृत्व करताना दिसेल. यासाठी भौतिक जीवनातीली उत्क्रांत व जीवनोपयोगी तत्त्वे आत्मसात करून मानवी जीवन खुरटणार नाही, उलट जीवनमूल्यांना उजाळा मिळेल, अशा प्रकारचा आध्यात्मिक दृष्टीकोन स्वीकारील. जीवन मूल्यांचे व आध्यात्मिक विचार संपदांचे शिरकाण होणार नाही हे पाहात असतानाच काळाला अनुरूप सांस्कृतिक जीवनाची रचना करून ती समाजाभिमुख करील. त्यातूनच सर्वांग सुंदर असे जीवन साकार होईल. हेच भारताच्या आध्यात्मिकतेचे वैशिष्ट्य आहे. यातूनच भारताला स्वत:सह विश्वकल्याण अभिप्रेत आहे. आमचा धर्म, आमची संस्कृती, आमचे तत्त्वज्ञान श्रेष्ठ आहे ही धारणा केवळ स्वप्न गुंजन राहता कामा नये. ती आपणांस प्रेरक ठरली पाहिजेत. त्या विचारातून, आचारातून, व्यवहारातून, पुनरपि एक विकसित उत्कृष्ट आणि प्रत्ययकारी भारताचे दर्शन घडावयास हवे.

**आम्ही काय केले पाहिजे :**

संकुचित व जीवन खुरटून टाकणाऱ्या गोष्टींना जीवनात स्थान देऊन त्याची जोपासना करण्याची वृत्ती टाकून दिली पाहिजे. शोधक बुद्धीने व कुशलतेने याचा शोध घेऊन भौतिक व आध्यात्मिक जीवन यथायोग्य कसे जगता येईल याचा धांडोळा घेतला पाहिजे. श्रद्धा आणि प्रेम या दोन श्रेष्ठ जीवनदायी शक्ती आहेत. धर्म व आध्यात्मिक विचार याची ही देण आहे. त्यांना धक्का न

लावता जीवनात त्याना योग्य ते स्थान देऊन उत्साह व जोम वाढविण्यासाठी त्यांचा उपयोग झाला पाहिजे. जीवन विषयक श्रद्धा व मानव विषयक प्रेम ही धर्म आणि आध्यात्मिक विचारांची बैठक आहे. हे समजून घेतल्या शिवाय जीवनाचा अर्थच उलगडणार नाही. हे नीट समजून घेतल्यानेच नवी प्रेरणा, नवे चैतन्य जीवनात प्राप्त होतील, आणि जीवनातील संघर्ष, असूया, अप्रिती आणि उदासीनता नाहीशी होईल.

**समन्वय :**

जीवनात सुसंवादिता निर्माण करणे हे धर्माचे कार्य आहे. सगळ्याच गोष्टी सगळ्यांना एक सारख्या करता येणे शक्य नसते. मनुष्य हा समाजातला एक घटक म्हणून राहतो आणि प्रत्येक समाजाची काही पथ्ये असतात. व्यक्तीचे जीवन या सर्व साधारण गोष्टीशी मिळते जुळते राहील हे पाहावे लागते. हाच दृष्टिकोन भारतीय संस्कृतीने आपल्या समोर ठेवलेला आहे. व्यक्तीच्या सामान्य आणि पशुतुल्य वासनाकडे, नागड्या स्वार्थाकडे आणि त्याच्या पूर्ततेसाठी लागणाऱ्या प्रयास पूर्वक धडपडीकडे असलेला ओढा काढून टाकून त्याही पलीकडे असलेल्या विशाल जीवनाच्या हेतूचे दर्शन घडविणे व दिशाहीनाला योग्य दिशा दाखवून धर्म जीवनाच्या उदात्ततेकडे वळविणे हेच धर्माचे प्रमुख कार्य आहे. याच्यातच तत्त्वज्ञानाचा व संस्कृतीचा अंतर्भाव आहे. या इथेच धर्म, तत्त्वज्ञान, संस्कृती यांचा संगम आहे.

**सांप्रतची परिस्थिती :**

आज आपण सारे धकाधकीच्या व संभ्रमित परिस्थितीत सापडलेलो आहोत. पाश्चात्य भौतिक जीवनाचा गराडा चोहोबाजूने पडलेला आहे. धर्म-विचार क्षीण झालेला आहे. प्राप्त परिस्थितीत स्वत:ची प्रतिष्ठा राखून कर्तव्य कसे पार पाडावे हे समजेनासे झाले आहे. धर्म व तत्त्वज्ञान विषयक शिक्षणाच्या अभावामुळे जीवनातीली अपूर्वता नाहीशी झाली आहे. तेज झाकाळून गेले आहे. आज घडीला साऱ्या भारतभर धर्म जागरण करणे अगत्याचे आहे. आपल्या धर्मात बदलत्या परिस्थितीवर मात करण्याची क्षमता आहे. धर्म आज मानवी जीवनापासून दूर गेला आहे. मानवाने सर्वांग सुंदर जीवन जगण्यासाठी, सर्व व्यापकतेसाठी, पूर्णतेसाठी धडपडणे व त्यातून वैश्विक एकात्मता प्रस्थापित करणे तसेच माणसा माणसात प्रेम वृद्धिंगत करित मानवी जीवनाला खरा अर्थ प्राप्त करून देण्याचे शाश्वत कार्य करीत राहाणे. हेच खरे धर्म जीवन, खरे भारतीय जीवन. यालाच अनुसरून पूर्वजाची या राष्ट्राचे ध्येय वाक्य नेहमीसाठीच आपल्यासमोर ठेविले आहे. 'कृण्वन्तो विश्वमार्त्रम्' संपूर्ण विश्वात सुजनता नांदवू. हे आपल्या राष्ट्राचे ब्रीद वाक्य आहे. याचा पाठ पुरावा करत आधुनिक जगताला त्याचे यथायोग्य दर्शन घहविणे हे प्रत्येक भारतीयाचे कार्य आहे. विशेषत: तरुणांना हे आव्हानात्मक आहे. भारतीय तरुणांनी हे स्वीकारलेच पाहिजे. त्याना मदत करण्यासाठी ज्येष्ठ - श्रेष्ठांनी पुढे आले पाहिजे. हे धर्म कार्य आहे. ईश्वरीय कार्य आहे. भारताला परम वैभवाला नेण्यासाठी सर्वच भारतीय प्रेरणा घेतील व या ध्येयाच्या पूर्तीसाठी झटतील अशी प्रबल इच्छा प्रगट करतो.

ॐ तत् सत् ।

**श्री. शं. बा. मठ**
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
वंदना बस स्थानकाजवळ,
ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३५२०३०

●●●

*दिशा संपर्क दूरध्वनी*
*२५४२६२७०*

# द्वारका दर्शन

*द्वारकेची यात्रा या संबंधातील हे सहल वर्णन. अशा प्रकारच्या सहली उत्तमपणे आयोजित करणारे गलांडे पती पत्नी यांच्याशी वाचक श्रीमती भिडे यांच्यामार्फत संपर्क साधू शकली - संपादक*

'राधे राधे गोविंद गोपाल राधे', 'हे गोपाल राधाकृष्ण गोविंद गोविंद। कृष्ण गोविंद गोविंद राधे गोविंद गोविंद।।

श्रीकृष्णाचे १२५ वर्षाचे अवतार, कार्य, त्यापैकी व्रजभूमीत - ११ वर्षे बाल लीला, प्रेमलीला, मथुरेत - १४ वर्षे पराक्रम, द्वारकेत - १०० वर्षे प्रतिष्ठा. व्रजभूमी वृंदावनात बाललीला, चौर्यलीला (दही, दूध, लोणी चोरून सवंगड्यांना खाऊ घालणे.) आधी चोरायची लीला मग चारायची.

नंदराज एक कोटी गाईंचा मालक म्हणून नंदराज ही पदवी. वृंदावनातलं दही, दूध मथुरेत विकायला जायचं. मथुरेत असूर होते म्हणून कृष्ण ते आडवून वृंदावनातल्या मुलांनाच खायला घाली. हे चौर्यकारण मग धर्मकारण, राजकारण, अध्यात्मकारण, भक्तीकारण.



तिथल्या गायी-गोपी कृष्णमय झालेल्या होत्या.

गौळणीने वर टांगला माठ।
त्यात ठेवले दह्याचे ताट।
खाली ठेवली खाट।
नि पहात बसली कृष्णाची वाट।।

प.पू.श्री. जगन्नाथ बुवा पाटील खांडवळ यांनी द्वारकेला 'भागवत कथा' सप्ताह केला. भक्ती रसात सर्वांना चिंब भिजवून टाकलं.

भारताची रक्षा चार नाथ करतात. १) बद्रीनाथ २) जगन्नाथ ३) द्वारकानाथ ४) पंढरीनाथ. द्वारकेची माती पवित्र पावन आहे. अशा द्वारका दर्शनाला येण्याचा योग ठाण्यातल्या श्री. व सौ. गलांडे यांच्यामुळेच आला. सागर किनाऱ्यावर असलेल्या गायत्री शक्तिपीठात आमची राहण्याची सोय केली होती. आल्या आल्या त्याच दिवशी आम्ही द्वारकाधीश मंदिरात द्वारकाधीशाचे दर्शन घेऊन आलो. मंदिरात दर्शनाला रांगा लागल्या होत्या. मूर्तीवर पडदा होता. तिथे देवाला भोग चढवताना, देव झोपले असताना पडदा लावलेला असायचा. दुपारी १२ ते २ भक्त ताटकळत दर्शनासाठी रांगा लावून उभे असायचे. ठरावीक वेळी पडदा उघडायचा. कृष्णाच्या काळ्या सावळ्या मूर्तीचे दर्शन घडायचे. देवासमोर खूप भोग (नैवेद्य) ठेवले होते. बराच वेळ उभे रहायला लागले पण दर्शन छान झाले. नंतर आम्ही सात दिवस तिथेच राहिलो होतो. त्यामुळे जेव्हा वेळ मिळेल तेव्हा असे चार पाच वेळा द्वारकाधीशाचे दर्शन घेतले. जवळपासची इतर मंदिरेही पाहिली. मंदिराला सुरक्षा व्यवस्थाही होती. मंदिराच्या वाटेवर रोजच बाजार भरलेला असायचा. जत्रेसारखा. इथला लोकांचा तोच पोटापाण्याचा व्यवसाय होता. पूजेची भांडी, पूजेची वस्त्रे, गंध, अगरबत्ती, हार-फुले, मखर, माळा, तोरणं, कपडे वगैरे. इथले गोधन डोळ्यात भरण्याइतके धष्टपुष्ट आहे. त्यामुळे दुग्धव्यवसाय मोठ्या प्रमाणावर चालतो.

द्वारकेला गोमती नदी समुद्राला मिळते. त्या संगमावर

गोमती देवीचे मंदिर आहे. गायत्री शक्तिपीठापासून रस्त्याने व समुद्रावरूनही मंदिरात जायला मार्ग आहे. गायत्री शक्तिपीठातदेखील गायत्री देवीचे सुरेख मंदिर आहे. आम्ही तिथेच उतरलो असल्यामुळे जमेल तसे सकाळ संध्याकाळ मंदिरात जात होतो. तिथेही स्त्रियालंकार खूप होते विकायला. शक्तिपीठात कथेसाठी बाहेर व भोजनासाठी मागे मांडव घातला होता. रोज सकाळी ६ ला चहा, मग ८ ला नास्ता चहा, त्यानंतर ९ ते १२ भागवत प्रवचन असायचे. मग भोजन - विश्रांती. नंतर ४ पासून हरिपाठ व ६ ला पुन्हा भागवत प्रवचन ते ९ पर्यंत. सात दिवस हा भक्तीरसात न्हाणून टाकणारा भागवत सोहळा चालू होता.

'जन्मातंर लभते पुण्यं तदा भागवत लभेत' त्याची कृपा, आमचं पुण्य एकत्र आलं की असा सत्संग घडतो. मोक्ष म्हणजे काय? मोक्ष = मो + क्ष, मो - मोह, क्ष - क्षय = मोहाचा क्षय. नमन (नमस्कार) - न मे इति:। 'इदं न मम' मी कोणीच नाही, हे माझं नाही. सारं सच्चितानंदस्वरूप आहे ही भावना जागृत होणं म्हणजे मोक्ष. बालपणी - माता, तरुणपणी - महात्मा, वृद्धपणी - परमात्मा भेटावेत.

**कर्म कसं करा तर :**

१. कर्म कुशलतेनं करा कृपणतेनं नको.
२. कर्म श्रद्धेनं करा स्पर्धेनं नको
३. कर्म निमित्त म्हणून करा नाईलाज म्हणून नको.

संसारात कर्तव्य भावनेनं जगा, आसक्ती, अहंकार-रहित. 'हे गोपाल राधाकृष्ण गोविंद गोविंद ... महाराजांच्या तोडांतून ज्ञानगंगा वहात होती. त्यात आम्ही चिंब चिंब होत होतो. सांसारिक - लोकांसमोर प्रदर्शन मांडतो. पारमार्थिक - स्वानंदात जगतो.

भागवत कथा गंगेसारखी. श्री विष्णूच्या अवतार कथा. विरले हे चित्त प्रपंचापासूनि. या विरक्तीची कारणे कोणती? १. परिस्थितीचा वीट २. दोषदर्शन ३. विवेक जागृती/देह हे भाड्याचे घर आहे, मालकाने मागितले की सोडायचे, परत करायचे. ४. सत्संगात वैराग्य ५. श्रेष्ठ सुखासाठी कनिष्ठाचा त्याग. आणि ६. भयामुळे. ''लटिका हा संसार। सोडी येरझार। सखा तो ईश्वर। ओळखावा।। कथाकार ज्ञानेश्वरांसारखे ज्ञानी व अल्यवयीन होते. त्यांच्या मुखातून वाक् गंगा दुथडी भरून वहात होती. श्रीकृष्ण जन्म आम्ही पाळणा सजवून पाळणा (अंगाई गीत, गाणी) म्हणून साजरा केला. तसंच श्रीकृष्ण रुक्मिणी विवाह कृष्ण मूर्ती व तुळशीला साडी नेसवून मुंडावळ्या बांधून अंतरपाट धरून, मंगलाष्टक म्हणून, अक्षता उधळून, पेढे वाटून थाटामाटात साजरा केला.

वीसला भागवत कथा समाप्तीनंतर एकवीस नोव्हेंबरला सकाळी सहाला आम्ही सोमनाथ येथे प्रस्थान केले. बारा ज्योतीर्लिंगापैकी एक असलेले हे सोरटी सोमनाथ. याला 'प्रभास पट्टन' म्हणूनही ओळखतात. फार प्रशस्त भव्य दिव्य असं हे शिव मंदिर आहे. मंदिराचे खांब व छत तसेच भिंतीवरचे कोरीव नक्षीकाम शिल्पकलेचा अद्वितीय नमुना आहे. इथे सुंदर सुंदर बागा व थुईथुई उंच उडणारी कारंजीही आहेत. मंदिराचा भवताल सागराने वेढलेला आहे. दूरवर दिसणारा अथांग सागर किनारा नि त्यावरून येणारा भन्नाट वारा मन तृप्त नि मुक्त करतो.

वीसला सकाळी भागवत समाप्ती झाल्यावर जेवून आम्ही श्रीकृष्णाने स्वत:च उद्वीग्न होऊन पाण्यात डुबवलेली त्याची सोन्याची द्वारका पहायला लाँचने निघालो. अर्ध्या पाऊण तासात तेथे पोचलो. आता ही पाण्यावर आलेली द्वारका सोन्याची नाही पूर्वीसारखी. तर तीर्थक्षेत्रासारखी मंदिरांची मांदियाळी असलेली अशी परमार्थ नगरी आहे. सर्व मंदिरांचे दर्शन करून आम्ही साधारण तीन तासांनी पुन्हा नवीन द्वारकेला शक्तिपीठात आलो.

(पान क्र. २१ वर)

# ‘ओसामा’

*‘ओसामा’ हा चित्रपट पाहून मन अस्वस्थ होते. मग विचार येतो, भारतातील स्त्री नशीबवान आहे --- संपादक*

शनिवार, १९ सप्टेंबर २००९ संध्याकाळी ४ वाजता जोशी-बेडेकर महाविद्यालयात ‘ओसामा’ नावाच्या चित्रपटाचे आयोजन केले होते. ‘ओसामा’ नाव घेतल्यावर आला, अर्थातच ‘ओसामा बीन लादेन’. वाटलं त्याच्या संदर्भात चित्रपट असेल, पण प्रत्यक्षात मात्र काहीतरी वेगळंच चित्र समोर आलं. प्रथमत: या चित्रपटाची कथा थोडक्यात मांडते. यानंतर त्यावरील माझी मते आपल्यासमोर मांडण्याचा हा प्रयत्न.

चित्रपट सुरू होण्याआधी माननीय डॉ. विजय बेडेकर यांनी ‘अफगाणिस्तान’ येथील भौगोलिक परिस्थिती, तिथे झालेली परकियांची आक्रमणं, या सर्वांमुळे या देशाचे झालेले अतोनात नुकसान याबद्दल माहिती दिली.

चित्रपट सुरु झाला, त्यात अफगाणिस्तानमधील एका गावात एक आई आणि तिची मुलगी लपतछपत स्वत:चा जीव वाचवत गर्दीतून रस्ता काढत जात असतात. ती स्त्री डॉक्टर असते. त्या दवाखान्याची अवस्था दयनीय असते. भीतीच्या सावटाखाली कशाबशा त्या दोघी घरापर्यंत पोचतात.

स्त्रियांवर होणारे अतोनात अत्याचार, त्यांची अतिशय हालाखीची परिस्थिती, शारीरिक मानसिक अत्याचार चित्रपटातसुद्धा बघवत नाहीत. या घरातील सर्व पुरुष वेगवेगळ्या प्रसंगांत मृत्युमुखी पडले असताना, स्त्रियांना बाहेर काम करण्याची बंदी असताना, उपजिविकेसाठी काय मार्ग काढायचा या विचारात असणाऱ्या या स्त्रियांना एक मार्ग सुचतो. अतिशय धाडसी असा निर्णय त्या घेतात. त्या तरुण मुलीचे केस मुलाप्रमाणे कापून, पुरुषांसारखे कपडे घालून तिला कामधंदा करायला बाहेर पाठवण्यात येतं. पण तिथून तालिबानी सैनिक त्या मुलीला आतंकवादी प्रशिक्षणासाठी नेतात.

तिथे इतर सगळे मुलगे. ही मुलाप्रमाणे वावरणारी मुलगी, त्यातच एक मुलगा तिला ओळखणारा असतो. तो या पुरुषांपासून वाचवण्यासाठी तिचं नाव ‘ओसामा’ आहे, तो मुलगा आहे असं सांगून तिचं रक्षण करतो. पण काही दिवसानंतर हे सत्य सर्वांसमोर येतचं. तिला एका दोराला बांधून विहिरीत लटकवण्यात येतं; आणि मग पुरुषांच्याच तथाकथित न्यायालयात तिला जीवनदान मिळतं. पण तिच्या वडिलांपेक्षाही मोठा असलेला मुल्ला तिला विकत घेतो. तिच्याशी लग्न करून तिच्याचसारख्या अनेक स्त्रियांना कोंडून ठेवलेल्या त्याच्या घरातील एका खोलीत तिलाही ठेवून देण्यात येतं आणि इथेच चित्रपट संपतो.

इतकं भयानक सत्य चित्रपटात बघणं सुद्धा कठीण होतं. डोक्याला अक्षरश: मुंग्या आल्या. मग हे सत्य प्रत्यक्षात सहन करणाऱ्या स्त्रियांची मानसिक आणि शारीरिक अवस्था काय असेल याचा विचार करून बघा. आपण आज २१ व्या शतकात स्त्री, पुरुष समानतेच्या गोष्टी करतो. स्त्रियांच्या विविध क्षेत्रातील कामगिरीकडे बघून आपली मान गर्वाने उंचावते. आज आपण घराबाहेर पडून नोकरी करून आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी असण्याचा प्रयत्न करतो. घरातील जबाबदाऱ्या पार पाडून बाहेरच्या

म्हणजे कामाच्या ठिकाणीही (कार्यालयातही) तितक्यात उत्साहात आपण जबाबदाऱ्या समर्थपणे पेलतो.

एक त्रिकोण डोळ्यासमोर आणू. ओसामा चित्रपटातील अतिशय हालअपेष्टा सहन करणाऱ्या स्त्रिया; ज्यांच्या शब्दकोशात 'स्वातंत्र्य' हा शब्दच नाही. ज्या स्त्रियांची स्थिती बंदिनी म्हणण्यासारखी आहे. हे झालं त्रिकोणाचं एक टोक. दुसऱ्या टोकाला अमेरिकेसारखे अतिशय प्रगत देश. जिथे नाते या शब्दाला अर्थच नाही. 'स्वातंत्र्यच स्वातंत्र्य' कोणाचं कोणावर बंधन नाही. प्रत्येकाने स्वातंत्र्याचा गैरफायदा घेतलाय अस वाटणारी परिस्थिती. तिथली स्त्री 'बंधमुक्त'. या दोन्ही त्रिकोणाच्या पायाच्या बाजू धरल्या.

भारतात स्त्रियांची परिस्थिती या त्रिकोणाची वरची बाजू म्हणायला हरकत नाही. भारतातील सुशिक्षित स्त्रीने तिला मिळालेल्या स्वातंत्र्याचा समतोल राखला आहे. स्वत:ची तसेच समाजाची प्रगती करण्यात मोलाचा हातभार लावला आहे.

आता, आपण खरचं किती नशिबवान आहोत याची प्रचीती आपणा सर्वांना आल्याशिवाय रहाणार नाही. महात्मा जोतीबा फुले, सावित्रीवाई फुले, धोंडो केशव कर्वे यांच्याबद्दल आपण कितीही कृतज्ञता व्यक्त केली तरी कमीच आहे, ज्यांनी स्त्रियांना शिक्षणाची व अथार्जनाची संधी मिळवून देण्यात मोलाचे योगदान दिले. आपण समस्त स्त्री वर्ग आजन्म या सर्वांचा ऋषी रहाणार यात तिळमात्र शंका नाही.

**सौ. प्रिती कुलकर्णी**
शिक्षिका, सौ. ए. के. जोशी स्कूल,
पूर्व प्राथमिक विभाग, ठाणे

•••

(पान क्र. १९ वरून)

**द्वारका दर्शन**

तिथे जवळच १७ सालातलं अहिल्यादेवी होळकरांनी बांधलेल हेमाडपंथी महादेव मंदिरही बघितले. नंतर प्रभासतीर्थ गीता मंदिर, गोलोक धामर ही कृष्णकाल कर्तृत्व सांगणारी मंदिरं साष्टांग प्रणिपात घालून पाहिली. या प्रभास क्षेत्रालाच भाले का तीर्थ नावाचे मंदिर आहे. मंदिरात कृष्णकालीन पिंपळ वृक्ष आहे. त्या वृक्षाखाली श्रीकृष्ण योग समाधीत बसले आहेत. समोर पारधी आहे, सावज समजून तो कृष्णाच्या पायाला बाण मारतो. पुढे ते सावज न्यायला येतो तो भगवंत दृष्टीस पडतात. तो क्षमा याचना करतो, शरण जातो. पण भगवंत म्हणतात 'तुझी काही चूक नाही.' अवतार समाप्तीसाठी भगवंतांनीच ही योजना केली होती. यादव मंदिरासक्त होऊन मंदोन्मत्त होऊन आपापसात कलह करू लागले, परस्परांचा नाश करू लागले. त्याने भगवंत व्यथित झाले. सुवर्णाची द्वारका त्यांनी स्वत:च समुद्रात बुडवून टाकली. नंतर पारध्याचे निमित्त करून अवतार समाप्ती केली. बाण पायाला लागलेले भगवंत व क्षमा याचना करणारा समोर उभा पारधी असा देखावा या मंदिरात आहे. यालाच प्रभासतीर्थ म्हणतात.

पुण्य पावन द्वारका नगरीचा निरोप घेऊन आम्ही सायंकाळी ७.३० ला वेटावळ येथून सोमनाथ एक्स्प्रेसने सकाळी ४ ला अहमदाबादला आलो व सातला गुजराथ एक्स्प्रेसने निघून मुंबईला आलो.

**श्रीमती आशा भिडे**
बी/९ विजय अर्पाटमेंटस्,
आराधना टॉकीजजवळ,
ठाणे (प.) ४०० ६०२
दूरध्वनी - २५४१०१४०
मोबाईल - ९३२४०४४७६४

•••

गरिबी कष्टानेच दूर होते.

पुस्तक परिचय

# कीर्तिवंत धन्वंतरी - वाचनीय पुस्तक

आपापल्या क्षेत्रात कीर्ती प्राप्त करणाऱ्या २६ डॉक्टरांच्या कार्य कर्तृत्वाचा परिचय असणारे २० लेखांचे 'कीर्तिवंत धन्वंतरी' ही श्री. अशोक चिटणीस यांचे पुस्तक वाचण्यात आले. एका वेगळ्याच जगातील पण अत्यंत मानवी अशा जीवनाचे अनुभव व त्या अनुभवांचा संवेदनशील असा परिचय या मुलाखत वजा लेखांमधून प्रत्ययाला येतो. या २६ डॉक्टर्सपैकी सर्वचजण आपल्या वैद्यकीय व्यवसायात यशाच्या परमोच्च शिखरावर तर आहेतच पण अनेक जण आपल्या कलाप्रियतेमुळे, सामाजिक दृष्टिकोनामुळे माणूस म्हणून 'फार मोठे डॉक्टर' या विशेषणाला योग्य ठरतील असे आहेत.

या २० लेखांतून श्री. चिटणीस यांनी या डॉक्टर्सचा रुक्ष परिचय करून दिलेला नाही. तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे आयाम जाणून घेताना, त्यांची जडणघडण जाणून घेताना त्यांच्या जीवनविषयक, व्यवसायविषयक चिंतनाचा, तत्त्वज्ञानाचा फार प्रभावीपणे परिचय करून दिला आहे. डॉ. विद्याधर ओक हे औषधशास्त्र तज्ज्ञ व संगीत संशोधक आहेत. त्यांच्याशी बोलताना 'तुम्ही औषध क्षेत्रातील असून औषध का टाळता' हा प्रश्न श्री. अशोक चिटणीस विचारतात. (पृ. २४३) या प्रश्नावरील डॉ. विद्याधर ओक यांचे उत्तर विचारप्रवृत्त करणारे आहे. म्हणून मुळातूनच येथे उद्धृत करतरो. 'आज औषध क्षेत्रातील नीतिमत्ता ऱ्हास पावलेली आहे. अनेक तरुण डॉक्टर्स औषध कंपन्यांचे एजंट्स बनले आहेत. औषधांचे दुष्परिणाम मला नको तेवढे ठाऊक आहेत ... त्यामुळे मी औषधाची एकही गोळी घेत नाही.' हे डॉ. ओक यांचे उत्तर गोळ्यांचा फराळ करणारांना विचार करायला भाग पाडणारे आहे.

या पुस्तकातील डॉक्टर्सच्या जडणघडणीच्या प्रक्रिया मुळातून वाचाव्यात अशा आहेत. डॉ. मुकुंद जोशी हे ख्यातनाम रेडिओलॉजिस्ट आहेत. त्यांच्या घरातील एक प्रसंग ते सांगतात, ''(वडिलांनी वडाळ्याला नेलं) तेथील झोपडपट्टी दुरूनच दाखवली. अन्नाला महाग असलेली माणसं दाखवली. घरी आल्यावर आईला बजावले, 'आज रात्रीचं जेवण याला देऊ नकोस... हा आमच्या घरातला मध्यमवर्गीय संस्कारांचा धडा देणारा प्रसंग...'' (पृ. १८३) यात स्वत:च्या मुलाला दृष्टीच नव्हे तर दृष्टिकोन देणारे वडील दिसतात तसाच तो दृष्टिकोन घडणारा मुलगाही आपण अनुभवू शकतो.

श्री. अशोक चिटणीसांच्या या प्रदीर्घ गप्पा वजा मुलाखती वजा लेख म्हणूनच मुळातच वाचाव्यात अशा झाल्या आहेत. झपाटल्याप्रमाणे इतक्या कीर्तिवंतांना वेळ ठरवून भेटायचं, त्यांना बोलतं करायचं, जाणून घ्यायचं हे सगळं काम अतिशय कठीण आहे. चिटणीसांनी या पुस्तकाच्या रुपाने ते केले आहे.

या पुस्तकातील या धन्वंतरींच्या अनुभव व तत्त्वज्ञानाच्या वैशिष्ट्याबरोबरच जाणवणारी एक ठळक बाब म्हणजे यातील प्रत्येक डॉक्टर, त्याचे जीवन भराचे अनुभव हा स्वतंत्र साहित्य निर्मितीचा मोठा विषय आहे. आजच्या काळानुसार सांगायचे झाल्यास त्यातून एखादी दूरदर्शन मालिकाही करता येऊ शकेल. अर्थात त्या मालिकेत मनोरंजनापेक्षा शिक्षणाचा भाग अधिक असेल. किंबहुना यातील डॉक्टर्सनी वेळ काढून जर आत्मचरित्रे लिहिली तर मराठी साहित्यात ती महत्त्वाची भर ठरेल.

डॉक्टर या व्यावसायिकाबाबत अनेकांची अनेक मते असतात. काही अगदी टोकाचीही असतात. काही बाबतीत विद्वत्ता नसून स्वत:ला विद्वान म्हणून घेणारी डॉक्टर मंडळीही अशा मतांना जबाबदार असतात. काहीही असले तरी डॉक्टर हा एक माणूस असतो. सामान्य

माणसाप्रमाणेच त्याचेही जगणे असते हे सत्य मान्य केल्यास येणारे असामान्यत्व का येते, कर्तृत्वाचे कोणते आयाम असे डॉक्टर्स पार करतात हे या पुस्तकामुळे समजायला मदत होते. माणसाचे आचार, विचार, दृष्टिकोन त्याला कसे समृद्ध करतात हे समजण्यासाठी हे पुस्तक आवर्जून वाचायला हवे. विशेषत: वैद्यकीय व्यवसायात नव्याने येऊ पाहणाऱ्या वा आलेल्या व्यावसायिकांनी, इतर व्यवसायांतील व्यावसायिकांनी हे पुस्तक वाचायलाच हवे. व्यवसाय म्हणजे काय, व्यावसायिक निष्ठा म्हणजे काय, त्यांची जडणघडण व्हावयाची असेल तर काय करावे या सर्वांची सखोल जाण या पुस्तकातून निर्माण होऊ शकते.




श्री. अशोक चिटणीसांचे हे १८ वे पुस्तक आहे. त्यांच्या लेखन शैलीतील ओघ, शब्दांकनाचे कौशल्य ही त्यांची वैशिष्ट्ये इतर पुस्तकांप्रमाणेच याही पुस्तकात आढळतात. परचुरे प्रकाशन संस्थेने हे पुस्तक प्रकाशित केले आहे. या पुस्तकाला व्यक्तिनाम निर्देश सूची मात्र शेवटी द्यावयास हवी होती. तसेच यातील डॉक्टर्सना भेटावयाचे झाल्यास त्यांचा संपर्क तपशील असणेही आवश्यक होते असे वाटते. पुस्तकाची निर्मिती परचुरे प्रकाशन मंदिरास साजेशी आहे. तसेच श्री. अनिल दाभाडे यांचे मुखपृष्ठही अत्यंत आकर्षक आहे. वर्णनातील जिव्हाळा, प्रवाही शैली, व्यक्तिमत्त्वाचे पैलू उलगडून दाखवणारी प्रत्ययकारी भाषा अशा सर्व वैशिष्ट्यांमुळे पुस्तक अत्यंत वाचनीय ठरले आहे.

- कीर्तिवंत धन्वंतरी – चिटणीस, अशोक
- मुंबई, परचुरे प्रकाशन मंदिर, २००९.
- पृ. १४, २६५.
- मूल्य रु. २००/– फक्त.

## सार्थ मंत्रराज

श्री समर्थ संप्रदायाचा पुनरुद्धार ज्यांनी केला ते श्रीमत् परमहंस परिव्राजकार्य श्री. श्रीधर स्वामी हे गुरुदत्तात्रयाचे अवतार व श्री समर्थ रामदास स्वामींचे शिष्य म्हणून सर्वज्ञात होते. त्यांनी आपल्या जीवन काळात अनेक प्रवचने केली. त्यांची अनेक प्रवचने ठाऊक असणारे बरेच भक्तही आहेत. त्यांच्या या प्रवचनांमधील सर्वार्थाने आगळेवेगळे ठरेल असे प्रवचन अलीकडेच योगायोगाने वाचनात आले. या प्रवचनाचे वेगळेपण म्हणजे श्री श्रीधर स्वामी यांनी स्वत: दिलेल्या गुरुमंत्राचे या प्रवचनात अतिशय प्रभावी, ओघवत्या भाषेत विवेचन केले आहे. विशेष म्हणजे हे विवेचन मुद्रित स्वरूपात आहे. विवेचनाचे हे छोटे पुस्तक सज्जनगडावरील श्री मारुतीबुवा रामदासी यांनी १९८८ साली प्रकाशित केले आहे. स्वत: श्रीधरस्वामी यांनी ३० सप्टेंबर १९७२ रोजी मंत्रावर केलेले ध्वनिमुद्रित स्वरूपातील जे प्रवचन होते, त्याचे हे मुद्रित स्वरूप आहे.

श्री. श्रीधरस्वामींचे हे प्रवचन दुर्मीळ आहे. याचे कारण, गुरुने दिलेल्या मंत्राचे गुरुने स्वत:च विवेचन करून सांगितलेल्या अर्थाची संहिता वाचायला मिळत नाही. श्री. श्रीधर स्वामींचा हा मंत्र पुढीलप्रमाणे आहे –

(पान ४०)

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

*देव देवतांच्या प्रतिमा व प्रतिके या अनुषंगाने संस्कृतीचे संदर्भ मांडणारा हा लेख - संपादक*

**प्रास्ताविक :**

दिशाच्या मागील अंकात आपण 'इतिहास' ह्या आधुनिक संकल्पनेचा अल्पसा विचार केला. पण, माझे एक मित्र श्रीयुत शंकर मठ म्हणाले की 'इतिहास' हा केवळ १९२० पासूनच सुरू झाला.

सहाजिकच ह्या 'इतिहासात' 'संस्कृती' ह्या कल्पनेचे स्वरूप एक तर एका देवीचे (हिंदू) चित्र, तसबीर किंवा मूर्ती असेच मानले गेले आहे. शिवाय ह्या देवीचा इतिहास हा माहीत नाही किंवा ही सर्व पुराण, कथा आहेत किंवा शुद्ध आगम आहे. पण, ह्या सरस्वतीच्या स्तोत्रात वर्णन केलेले देवतेचे स्वरूप हे नितांत श्रद्धेचे स्थान आहे, ह्यात शंका नाही.

काय आहेत या श्रद्धा? सरस्वती हे एका देवतेचे नांव आहे. ही देवता विद्येची, स्फूर्तिदायी अशी आहे. तिच्या हातात वीणा व बाजूला मोर असतोच. कां या चीजा असतात? त्याची मीमांसा मानवी बुद्धीने किंवा स्तोत्रातील वर्णनाच्या आधारावर केल्या जातात.

**सरस्वती देवता की नटी? :**

पण, ह्या श्रद्धेला जबरदस्त तडा जाणारे चित्र एका जगद्विख्यात चित्रकाराने काढले. ह्या कलावंताचे नाव मकबूल फिदा हुसेन. त्याने काढलेले चित्र एका सिने नटीच्या स्वरूपावर आधारले होते. तिचे नाव प्रसिद्ध माधुरी दीक्षित. पण, ह्या हुसेन साहेबांचे जे चाहते आहेत ते ह्या 'सरस्वती' संकल्पनेचे कौतुक असे करतात, म्हणजे हुसेन साहेबांनी अत्यंत खोलवर अभ्यास करून हे चित्र काढले आहे असे त्यांचे म्हणणे आहे. अर्थातच ते हुसेन साहेबाच्या मॉडर्न आर्ट ह्या फोर्ममध्ये चितारले, अभिव्यक्त स्वरूप आहे. हुसेन साहेबांना त्यांच्या प्रतिभेच्या सहाय्याने 'सरस्वती काय किंवा इतरही हिंदू देव देवता ह्या 'नग्न' अवतारात भावतात असे दिसते व तसेच त्यांनी हे चित्र साकारले आहे.




ह्या चित्रावर ज्या तीव्र प्रतिक्रिया बजरंग दल ह्या हिंदू आक्रमक संस्थेच्या कार्यकर्त्यांकडून झाल्या ते सर्वश्रुत आहेच. पण, हुसेन यांच्या इतरही खटकणाऱ्या चित्रांबद्दल जगात ज्वलंत प्रतिक्रिया झाल्या व त्यांच्या अमेरिकेतल्या चित्र प्रदर्शनावरही आक्षेप घेतले गेले व कोर्ट केसेस झाल्या.

**घटनांचा अर्थ :**

ह्या 'सरस्वती-विषय' व संकल्पनेवर पुढच्या काळात अनेक उलाढाली होणार होत्या. याची कल्पना त्या वेळी कुणालाही नव्हती.

ज्ञानाबरोबरच कल्पनाशक्ती असणे महत्त्वाचे असते.

या लेखाचा विषय - त्यामुळेच, या घटनेचा कोणता अर्थ लावायचा - सरस्वती ही संकल्पना मुळात काय आहे - ती 'हिंदू देवता' आहे - कीं 'सरस्वती नदी' आहे कीं ऋग्वेदीय आध्यात्मिक संकल्पना आहे - कीं हुसेनसारख्या जग प्रसिद्ध चित्रकाराच्या मनातील 'माधुरी दीक्षित' या सौंदर्यवती नटीची व हिंदू देवतांबदलची 'वैषयिक विकृती आहे' - हा आहे. आणि त्याच्याही पुढे जाऊन सरस्वती ह्या मुळ पौराणिक संकल्पनेमागील 'सत्य दर्शन' घडवून आणण्याची 'एक वैश्विक योजना' आहे, हा आहे.

**सामाजिक विचारांची पातळी :**

पण इतक्या गंभीर विचारधारेच्या अगोदर प्रचलित समाजाने ह्या घटनेची कशी दखल घेतली हे जाणणे आवश्यक ठरेल. कारण, त्यात आजच्या युगांत मानवी विचारांची कोणती पातळी आहे, बुद्धीची ज्ञानाची, संस्कृतीची, कलेची व एकंदर जीवनाची हे उमजेल. **मेहेर पेस्तनजी** आपल्या 'Art Attack is a Growing Disease' ह्या टाइम्स मधील लेखात लिहितात :-

The protesters have conveniently ignored the larger context of the work and chosen to focus on a single painting.

The other painting to meet their disapproval is a line-drawing of a semi-nude woman under which is written 'Saraswati'. The B.J.P. activists object to a deity's breasts being revealed. One wonders whether they are aware of the existence of khajuraho and Konark, where they will certainly see much more than bare breasts. And, nobody doubts that these are temples leave alone calling them works that insult religion."

**अनिल धारकर** बॉम्बे टाईम्स (११-१०-९६) मध्ये लिहितात :-

"Much has been made about the fact that only Hiudu Gods and godesses are depicted in this way. That argument is silly because it ouverlooks traditions. Christiauity has always, except for a stray case here and there, depicted Jesus Christ with a modest loin cloth. Islam prohibits the pictorial depiction of Mohemed.

In fact, in the strictest sense, it proscribes the depiction of any human form. Where as Hinduism, uniquely amougst religious, has glorified the human body and its physical senses. We worship the Yoni and the limgam and Krisna disrobes the gopis.

That is the problem with religious fundamentalists. They alwaus glorify their traditious, while knowing nothing about them, which is why they always remain a rabble waiting to be aroused."

इंडियन एक्स्प्रेसच्या ऑक्टोबर १०, १९९६ च्या संपादकीय अग्रलेखात खालील शेरे आहेत.

"Husain's unlearning" - A phoney war over divine nudity.'

"A Disrobed Saraswati in an erotic posture has evoked such a catharsic amonng aesthates and a peculiar variety of politicos that issues like freedom of expression and the state's definition of art are being contested on the streets.

... "For Husain, an ageing sensationalists, who is reiscovering bodies as beautiful as Mother Teresa and Madhuri Dixit, Saraswati and Draupadi, freedom is as restless as his brush.

..."The New Religion of Art, badly needs more literate devotees with no--sological baggage."

**नवाकाळ :**

नवाकाळ ह्या २८-५-९७ च्या अंकात ''कसाई वृत्तीचे हुसेन'' यावर खालील भाष्य होते. ''हम आपके कौन'' हा चित्रपट उदंड चालला होता. माधुरीच्या घरंदाज

सौंदर्यावर ख्याजकीर्त चित्रकार फिदा हुसेन, फिदा झाले असून, त्यांनी तो चित्रपट २४ वेळा पाहिला आणि माधुरीला आपल्या कुंचल्यातून साकारण्याचा त्यांनी निश्चय केला. लावण्याची खाण असलेल्या माधुरीची चित्रे रेखाटली गेली. पण, पुढे हुसेन साहेबांची मूळची प्रवृत्ती उफाळून आली.



**चित्रकार हुसेन**

ज्यांत माधुरीला नैसर्गिक अवस्थेत चितारून तिच्या अंगावर उंट स्वार झाल्याचे चित्र या बहादूराने रेखाटले.''

**अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य :**

ह्या विद्वानांच्या चर्चेमध्ये ''कलाकाराचे अभिव्यक्तिचे स्वातंत्र्य'' हा विषय वारंवार येतो. त्याचा आपण नंतर विस्तृत समाचार घेऊंच, पण, तत्पूर्वी प्रचलित पातळीवर कलाकारांच्या क्षेत्रातही ह्या 'अभिव्यक्ती' बद्दल काय निराळ्या प्रतिक्रिया आहेत त्या पाहू या.

**लक्ष्मण श्रेष्ठ –** लक्ष्मण श्रेष्ठ हे आपल्या "Husain has studied Hindu religion deeply" (ह्या ता. १० ऑक्टोबर १९९६ ह्या 'एक्स्प्रेस न्यूजलाईन,'' ह्या लेखात म्हणतात :–

'Artists are enlightened people. They do respect the religious significance of any theology. But, they tend to look at any theology in the visual sense and their concern is the artistic way of expressing it. Husain is one artist, who has gone deep into Hindu religion as no artist has done.'

"A little tension is necessary for creative artists. we are born that way."

**हिंदू धर्माचा अभ्यास :**

हुसेन यांनी हिंदू धर्माचा खोलवर अभ्यास केला आहे कीं, असा एकाही कलाकाराने केला नाही असा निर्वाळा लक्ष्मण श्रेष्ठ हे देतात. शिवाय, ते पुराणातील संकल्पना दृष्ट संकल्पनांत आणतात आणि कलात्मक पद्धतीने चितारतात. हे त्यांचे सर्टिफिकेट किती खरे आहे हे आपण तपासूच.

**इंदर शर्मा –** पण इंदर शर्मा हे आणखी एक चित्रकार सुद्धा गॉडस् व गॉडेसेस – देव व देवता यांची चित्रे कित्येक दशके कॅलेंडरकरिता काढत असतात. व त्यांची कन्या निमीषा दूसऱ्या टोकाला नग्न सौंदर्य चित्रकलेत साकार करत असते. त्यांची प्रतिक्रिया वाचू या.

I Sharma "feels that those artists, who are supporting Husain are doing it in their own interest.

They are the creators of the so called modern art. Under the garb of modern art a lot of nonsense passes.

These people do not visualise the pictures in their mind. They first paint something and later try to give it a name."

(इथे 'सरस्वती' हे नाव हुसेन यांनी नंतर लिहीलेले स्पष्ट दिसते.)

**निमीषा –** निमीषा ह्या म्हणतात – "When I saw Husain's piece,which he calls 'Saraswati" I was absolutaly ashamed, because I saw no beauty there. Then there is also no question of Ethics. Does Husain have a right to act out all his fantasies?

Certaiuly an Artist has freedom of expression. But this freedom comes with a responsiulity.

**दीपक घारे** – ही अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्याबरोबर येणारी जबाबदारी कोणती ते आपण पुढे पाहूयाच!!

पण, या सर्व प्रतिक्रियांच्या अत्यंत सामान्य व अपेक्षित जंजाळापुढे आमच्या ग्रंथालीचे एक मान्यवर टीकाकार दीपक घारे हे काय म्हणतात, हे पाहणे जास्त उद्‌बोधक किंवा मूळ मुद्दयाकडे लक्ष वेधणारे ठरेल असे वाटले.

''हुसेन आणि कलावंताचा धर्म'' (सरस्वतीच्या चित्रावरून फुका वादळ' ह्या आपल्या 'रुची' ह्या ग्रंथाली वाचक चळवळीच्या मासिकांत (जानेवारी १९९७) काय लिहितात ते पहा.

''सरस्वतीचे नाते नदीच्या प्रवाहाशी जोडले गेले आहे. ऋग्वेदातल्या सत्यसिंधू स्तवनात सरस्वतीचे नाव आहे. वेदांमध्ये वाणीशी संबंधित अशी वाकदेवी म्हणूनही ती येते. पुराणामध्ये तिचा उल्लेख त्रिपुरसुंदरी म्हणून येतो. कमळ हे खरे तर आदिसागरातील निर्मितीचे प्रतीक, आर्येतर संस्कृतीतून आलेले. पण, इथे ते सरस्वतीचे आसन आहे. श्वेतवस्त्र परिधान करणारी, हातात ग्रंथ आणि जपमाळ धारण करणारी असे तिचे रूप आहे.



राजा रविवर्मा यांच्या चित्रांत दिसणारी आणि आज रूढ झालेली प्रतिमा, सरस्वतीच्या या रूपाशी मिळती जुळती आहे.

तंत्रविद्येत मंत्रशक्ती म्हणून ती येते. ज्ञानशक्ती, इच्छाशक्ती आणि क्रियाशक्ती या रूपांतही ती आढळते. वेदातील पूर्ण घट हा सरस्वतीचे प्रतीक आहे. मातीचा घट हा पाण्याने भरलेला असून तो गर्भाशयाचे प्रतीक आहे. तर स्वस्तिक हे पुरुषबीजाचे, आंब्याची डहाळी आणि नारळ सृजनाची प्रतीके आहेत.

हे सर्व सांगण्याचा उद्देश एवढाच आहे की, देवदेवतांच्या प्रतिमा आणि प्रतीके यांचा गाभा तोच असला तरी बाह्यरूपे संदर्भानुसार, लोकसंस्कृतीनुसार बदलती असतात. त्यात अनेकदा अनेक प्रवाह येऊन मिसळलेले असतात. त्यातली खरी आणि पूजनीय प्रतिमा कोणती, हे त्या त्या पंथानुसार ठरते. पण कलावंताला स्वातंत्र्य असते, प्रतीकांच्या सतत बदलत्या आणि नवनिर्माणक्षम रूपात. श्रद्धा ही मूर्ती अथवा प्रतीकाकडे अपरिवर्तनीय रूप म्हणून पाहते. तर चित्रकार अथवा कलावंत त्याच प्रतीकाकडे परिवर्तनशील अनेकांशी अविष्काराचे उगमस्थान म्हणून पहातो...''

''हुसेनच्या विरोधकांनी सरस्वतीच्या प्रतिमेविषयी घेतलेले आक्षेप भारतीय कलेच्या परंपरेत बसणारे नाहीत. कारण, एक संस्था या अर्थाने हिंदुत्व हा धर्म आपण मानलेला नाही. हिंदु धर्मातील ''मिथके'' ही संस्कृतीचा एक भाग आहेत, आणि त्याच्या विविध अन्वयार्थांमध्येच त्यांचे सामर्थ्य दडलेले आहे.''

''तेव्हा कोणत्याही धर्मपंथाचा आग्रह धरण्यापेक्षा कलावंताचा धर्म प्रमाण मानणे हेच श्रेयस्कर. त्याच्या सद्‌सद्‌विवेकबुद्धीला जे वाटेल तोच धर्म. कला व धर्म यांच्यात द्वंद्व निर्माण करणे कुणाच्याच हिताचे नाही.''

**वृंदा नाबर –** ता. ११-१०-१९९६ च्या टाइम्स मध्ये Dionne Bunsha यांनी मुंबई विद्यापीठाच्या इंग्रजी विभागाच्या प्रमुख वृंदा नाबर यांची जी मुलाखत घेतली ती लक्षात घेण्याच्या योग्यतेची आहे.

Q. - Can artistic expression be absolute? If there are limitations, where do you draw the line?

A. - No freedom can be absolute. There has to be a constant interation between an individual's freedom to express, act, outrage and his role as a social being. The limits cannot be absolute. But, the artist has to be sensitive to the society, and have an artistic conscience. Conscience, unfortunalely, is a sort of bad word in the artistic commnity."

Q. - Has there been a tradition of depiciting Hindus gods and godesses in the nude in Indian curlture?

A. - "--- we have moved away in values, which those temples represent, it would be dishonest to use them to bolster an argument about Husain's painting, which, is a product, whose existence is conditioned by today's norms of a market-driven economy. You can't just pick and choose an argument whenever it suits you.

Secondly, Husain is painting for money. The painting's bottom line is commercial value, which is not true of khajuraho or Ajanta. In fact that to compare them is a short sighted and blinkered defence."

**भेळपुरी :**

'सरस्वती' ह्या संकल्पनेवर चर्चा होण्याऐवजी इथे असे दिसेल कीं, चित्रकलेच्या क्षेत्रांत अभिव्यक्ती, धार्मिक वाद, राजकारणातील सत्तासंघर्षामधील धर्माचा लिव्हरेज (तरफेची दांडी), नग्नतेतील वैषयिक शृंगारिक चेतावणी, ऐतिहासिक लेणी व त्यांतील शिल्पे-नग्न शिल्पे, योनी पूजा, लिंगपूजा ह्या बद्दल असणाऱ्या अज्ञानी सेक्यूलरवाद्यांच्या स्वत:च्याच वैषयिकतेच्या भिंगऱ्या, चित्रकलेची व्यापारी 'अभिनव दृष्टी', वगैरे अनेक भेळपुरीची मैफल उडालेली दिसेल.

**अज्ञानी विद्वान :**

आपल्याला या लेखांत या सर्व बारकाव्यांचा परामर्श वेळेअभावी घ्यावयाचा नाही. कारण, ह्या सर्व अज्ञानी विद्वानांना 'सरस्वती' ह्या संकल्पनेचा उगम व त्या संकल्पनेचा मूर्त स्वरूपातील प्रतीकांत झालेले संक्रमण ह्याचा पत्ताच नाही. जरी त्यांनी विद्वत्तेचा आव आणला तरी खेदाने असे म्हणावे लागेल की, त्यांना मूळ संकल्पनेबद्दल उत्सुकता नाही. एक तऱ्हेची अनावस्थाच आहे. हे कसे व कां हे पुढे पाहू या.

ह्या सर्वसाधारण अज्ञानी अहंकाराची व पवनचक्कीशी वाऱ्यावर तलवारीने लढाई करणाऱ्या 'सँको पांझा' याची उपमाच योग्य ठरेल.

**सरस्वती प्रार्थना :**

याचा आणखी नमुना म्हणजे **डॉ. मुरली मनोहर जोशी यांनी केलेल्या 'सरस्वती प्रार्थना'च्या सूचनेवर सेक्यूलर व इस्लामी फंडामेंटलिस्टांनी केलेला गदारोळ.**

पण, हे अज्ञान इथेच थांबले नाही तर, **आदरणीय मोरोपंत पिंगळे** व इतर काही यांच्या आग्रहावरून **'डॉ. एस्. कल्याणरामन'** यांनी केलेल्या अवाढव्य **'SARSAVTI' RIVER PROJECT** बद्दलही अंशत: लागू पडेल. कसे ते आता पाहू या.

**सरस्वती प्रोजेक्ट :**

या इथे आता 'सरस्वती' ह्या मूळ संकल्पनेचे रूपांतर **'सरस्वती नदी व तिच्या काठची सरस्वती, आर्य किंवा हराप्पन संस्कृति ह्याबद्दलचा एक अत्यंत मोठा ऑर्किलिऑलॉजिकल रिसर्च प्रोजेक्ट होय.**

**या प्रोजेक्टचा संभार बाबसाहेब आपटे स्मारक समिती, भारतीय इतिहास संकलन समिती बंगलोर यांनी संभाळता आहे.**

**'शिक्षणाचे भगवेकरण?' :**

**अर्जुन सिंग ह्या CMP ह्या नवीन केन्दीय काँग्रेसी मंत्र्याने शिक्षण क्षेत्रातील सँफ्रनायझेशनच्या** त्यांच्या प्रयत्नांत जे आक्षेप डॉ. जोशींवर केले. त्याचा परिहार करतांना **डॉ. मुरली मनोहर जोशी** यांनी उद्गार काढले कीं

**" --- the government was influenced by the marxist perception on education, which was unjust as it completely ignored India's Vedic past, especially after the existence of the mythical Saraswati and the presence of a civilization along its banks had been established" (Times 18-6-2004)**

**वेदिक संकल्पना व वास्तव नदी :**

'सरस्वती' ह्या भारतीय, हिंदू, वेदिक मूळ संकल्पनेशी हा वाद आता नक्कीच जास्त जवळ आला. त्याचे श्रेय डॉ. जोशी व डॉ. कल्याणरामन समूहाला द्यावयालाच पाहिजे.

**मग त्यांना पुरते श्रेयाचे धनी कां होता आले नाही?** हे समजून घेण्यासाठी येथे थोडासा श्वास घेणे व जास्त लक्ष देणे आवश्यक आहे. कारण, ह्याची मीमांसा **'स्पिरीच्यूअल सायन्स'** ह्या प्रांतातील आहे व त्या शास्त्राचा अर्वाचीन अधिकार **महायोगी अरविंद घोष, पाँडिचरी** यांना द्यावा लागतो.

**डॉ. कल्याणरामन** यांनी त्यांच्या 'सरस्वती' प्रोजेक्टच्या पहिल्या पुस्तकांत ज्या शास्त्रांचा **(मल्टी डिसीप्लीनस्)** आधार घेतला त्यांचा उल्लेख आहे.

**"I have drawn on the research of many scholars, who have studied the civilization from many diliciplines and many perspectives: archaelogical, artistic, linguistic, ethnographic, geological, hydrological and historical---"** (P. XVIII)

**स्पिरीच्यूअल सायन्स वाद कां? :**

ह्या पुस्तकात ऋग्वेदाचाही आधार दर्शविलेला आहे. तरीही त्यांना 'सरस्वती' ह्या सत्य दर्शनाची जाणीव झालेली नाही असे दुर्दैवाने म्हणावे लागेल.



कारण? कारण असे की ऋग्वेदातील मूळ संस्कृत ऋचांचे 'अर्थ' लावण्यासाठी त्यांनी सायनाचार्य व विल्सन ह्या 'विभूतींचाच' (विद्वानांचा) आधार ग्राह्य मानला आहे. त्यामुळे, फार मोठी गफलत झाली आहे.

**महायोगी अरविंद :**

त्यांनी जर श्री. अरविंद यांचे ह्या संबंधातत्वे **'The Secret of the Veda'** हे पुस्तक नुसते चाळले असते तर त्यांना एक मोठा प्रमाद टाळता आला असता.

विश्वरचनेमध्ये पुरुषसुक्तांत वर्णन केल्याप्रमाणे व्यक्त जगाच्या तिप्पट अव्यक्त जग आहे.

विश्वरचनेमध्ये **जेव्हा शक्तीचा प्रथम उगम झाला** तेव्हां ह्या **स्वसंवेद्य शक्तीच्या अनेकविध अविष्कारामध्ये हे जड जग निर्माण झाले. त्यांतच आपली पृथ्वी व त्यावरील 'विशेष प्राणी–मानव' हा निर्माण झाला.** ह्या अनंतकोटी ब्रह्मांडाचे ज्ञान होण्यासाठी साधनसामुग्री त्याच्या देहात, बुद्धीत, मनांत व अंतःकरणात काही व्यक्त स्वरूपांत व काही निद्रित अवस्थेमध्ये ठेवण्यांत आली आहे. हया कूटस्थ निद्रित सामुग्रीला जागृत व समर्थ करण्यासाठी काही साधना – (योगिक), ह्या आवश्यक आहेत त्या साधनेला मदत करणाऱ्या ज्या तीन मुख्य वैश्विक शक्तींची नांवे **इला, मही, सरस्वती** अशी आहेत.

**वैश्विक शक्ती :**

इथे, पुन्हा एकदां श्वास घेऊन सरस्वती नदी, सरस्वतीच्या काठची 'सारस्वत संस्कृती याच्या पाठीमागे जाऊन 'सरस्वती' ह्या संकल्पनेची स्पिरीच्यूअल प्रांतातील मूळ कल्पनेकडे जाण्याचे प्रयोजन काय असा प्रश्न उपस्थित होईलच. त्याचा विचार बघितला पाहिजे.

**ऋग्वेद :**

जर **ऋग्वेद हे मानवी साहित्य व शब्दसंस्कृतीचे अत्यंत जुने व मूळ क्षेत्र मानले तर त्यांत 'सरस्वती' या शब्दाचा प्रथम उल्लेख झाला हे मान्य व्हावे, व त्यानंतर** इतर गोष्टींना म्हणजे नदी, मूर्ती, चित्र व संस्कृती यामध्ये या 'सरस्वती' मूळ कल्पनेचा विस्तार किंवा नामकरण, वा काव्यात छटांचा रंगांचा लाभ झाला हे उघड आहे.

**सत्यज्ञान :**

मग, स्पिरीच्यूअल सायन्स मार्फत ह्या विश्वांतील चिरंतन अशा तत्वांचा जर सत्य परिचय व ज्ञान व्हावयाचे असेल तर ते सामान्य मानवाला दुरापास्त आहे. ही जाणीव मुख्य आहे. त्या जाणीवेकरिता **इला (दृष्टी – Truth Vision), मही (Truth Consciousness), सरस्वती (Truth Audition – श्रुती)** ह्या वैश्विक शक्तींच्या मदतीची आवश्यकता आहे.

**वेदांचे खरे अर्थ व बोध :**

ह्या ठिकाणी महायोगी अरविंद काय म्हणतात हे त्यांच्याच शद्बांत जाणणे महत्वाचे ठरेल.

**'इला, सरस्वती, मही तिस्रो देवीर मयो भुवः।**
**बर्हि सदिन्त्व् अस्त्रिोधः ।। (ऋ : १.०१३.०९)**

याचे शद्बशः भाषांतर 'सरस्वती' ह्या कल्याणरामन ह्यांच्या शोधपुस्तकात असे दिले आहे.

**'may the three undecaying goddesses, givers of delight, sit upon the sacred grass.'**

**उघडच आहे की या अर्थाने कांहीच बोध न** होता, हे वेद हे एखाद्या तर्र झालेल्या कवींची बेलगाम विसंगत बोधहीन, अर्थहीन कवने आहेत असे वाटेल. ह्याचा दोष केवळ व्याकरणावर आधारलेले भाष्य करणारे सायनाचार्य व परकीय संस्कृतीत शिकलेले व वाढलेले विल्सनसाहेब यांच्याकडे जाईल. दुदैव हे आहे कीं अजूनही पाश्चात्य विद्येतील पारंगत विद्वानांकडे अशी कामे सुपूर्त केली जात आहेत.

मग खरी गोष्ट ही आहे की हे खरे अर्थ प्राप्त होण्यांसाठी योगिक ज्ञानाची, अध्यात्मज्ञानाची व शक्ती जागृत झालेल्या शुद्ध व सत्वशील मनाच्या साधकाची आवश्यकता आहे. मग त्याकरितां जी प्रचंड धडपड, अभ्यास श्री अरविंदांनी केला त्यांचे संपूर्ण भाष्य 'The Secret of the Vedas' ह्या ग्रंथांतून वाचावयाला व अभ्यासावयाला हवे.

अरविंद यांच्या सत्य अर्थ प्राप्त करण्याची गुरुकिल्ली

कोणती व त्यांचे ‘सरस्वती’ ह्या विषयावरचे संशोधन कोणते ते आतां पाहू या.

**"- - the veda has a double aspect. .**

**The Rishis arranged the substance of their thought in a system of parallelism by which the same deities were at once internal and external Powers of universal Nature a system of double values, by which the same language served for spiritual enlightenment and self culture."**

**True Knowledge :**

ज्या सामान्य मानवाला जड सृष्टीच्या मर्त्यपणाचे भ्रम निरासणारे ज्ञान इंद्रियामार्फत होऊ शकत नाही व सत्य व ऋत (वेदीक)‘सत्यतत्वांचे दर्शन वा बोध घडत नाही त्याला ह्या **'Truth Consciousness'** च्या प्राप्तीची आवश्यकता आहे.

**वेदातील सरस्वती :**

**Saraswati (Cosmic Energy) is an awakener of the consciousness to right thinkings or right states of mind.**

पुढे अरविंद म्हणतात तेही महत्वाचे आहे.

**Saraswati, the inspiration, is full of her luminous plenitudes, rich in substance of thought she upolds the Sacrifice, (यज्ञ - हे पुढे पाहूं) the offering of the mortal beings activities to the diviue by awakening his consciouners. So that it assumes right states of emotion and right morements of thought in accordance with the truth from from which she pours her iluminations and by impelling in it the rise of those truths, which according to the vedic Rishis, liberate the life and being from falsehod, weakness and limitations and open to it the doors of the Suprame felicity.**



**Hypocricy of Husain**

http://www.hindujagruti.org/activities/campaigns/national/mfhussain-campaign/

**“Out of the four leaders M. Gandhi is decapitated and Hitler is naked. Husain hates Hitler and has said in an interview 8 years ago that he has depicted Hitler naked to humiliate him and as he deserves it ! How come Hitler’s nudity cause humiliation when in Husain’s own statement nudity in art depicts purity and is in fact an honour ! This shows Husain’s perversion and hypocrisy.”**

**“Conclusion M.F. Husain depicts the deity or person he hates as naked. He shows Prophet’s Mother, his own mother, daughter, all the Muslim personalities fully clothed, but at the same time Hindus and Hindu deities along with Hitler are shown naked. This proves his hatred for the Hindus. For other obscene paintings.”**

सामान्य माणसाचे जे ज्ञान आहे त्याला ते "false Mortal Vision of things" असे म्हणतात. भौतिकवादी विद्वान व शास्त्राज्ञांचे ज्ञान सुद्धा ह्याच दर्शनात मोडते.

**ऋग्वेद व अर्थ :**

**‘‘पावका नः सरस्वती वाजेभिर् वाजिनीवती।**
**यज्ञं वष्टु धियावसुः।। (ऋ १.००३.१०)**

दुसऱ्याची फसवणूक केल्यास आपलेच नुकसान होते.

**चोदयित्री सूनृतानां चेतन्ती सुमतीनाम्।**
**यज्ञं दधे सरस्वती।। (ऋ १.००३.११)**

ह्याचे सायनाचार्य वा विल्सन यांचे भाषांतर देत नाही. ते अर्थहीन व चुकीचे आहे. जिज्ञासूंनी ते डॉ. कल्याणरामन यांच्या 'सरस्वती' ग्रंथातून वाचून खात्री करावी पण, **पं. श्रीराम शर्मा आचार्य** ह्या ('गायत्री संप्रदायाच्या' आध्यात्मिक - 'अधिकारी') योग्याचे भाषांतर देतो आहे. **''हे पवित्र करमेवाली सरस्वती!** तू बुद्धिद्वारा अन्न-धन का देनेवाली है। **हमारे इस यज्ञ को सफल कर।।१०।।**

**सत्य कर्मों की प्रेरक उत्तम बुद्धि को प्रशस्त करनेवाली यह सरस्वती हमारे यज्ञ को धारण करनेवाली है।।११।''**

**''महा अर्णः सरस्वती प्र चेतयति केतुनां।**
**धियो विश्वा विराजति।। (ऋ १.००३.१२)**

**''सरस्वती विशाल 'ज्ञान समुद्र' को प्रकट करने वाली है। वही सब बुद्धियों को ज्ञान की ओर प्रेरित करती है।।१२।।''**

**शक्ती कीं नदी :**

मग सरस्वती ही एक पंजाबमधील नदी आहे ही कल्पना ह्या 'सरस्वतीच्या' आध्यात्मिक सामर्थ्यावरून कशी काय ठाम किंवा स्थिर व मान्य होऊं शकते? हा प्रश्न आहे.

**सप्त नद :**

'क्या वेद में इतिहास है' ह्या छोट्या पुस्तकाचे लेखक चतुर्वेद भाष्यकार, श्री. पं. जयदेव शर्मा विद्यालंकार मीमांसातीर्थ (१९५४) (प्रकाशक आर्य साहित्य मंडळ लिमिटेड) आपल्या पुस्तकात पा. नं. १६८ वर ''ऋग्वेदातील सप्त नद्या यांची भूमिका स्पष्ट करतात.

जीवात्म्यापासून देहामध्ये अंतरंगात वाहणारे सात स्त्रोत म्हणजे सात नद्या.

''आत्माग्नि मध्य मे है। उस उद्‌गम स्थान से सात प्रवाह चलते है।

१) अहंकार २) मन ३) श्रोत्र ४) स्पर्श ५) नेत्र ६) रसना ७) नासिका

ये सात नदी है। जो आत्मा के स्थान से बह रही है। सुप्त अवस्थामे वे सातो नदीयाँ अन्तर्मुख होकर उल्टी बहने लग जाती है और आत्मामे मग्न हो जाती है। परंतु जागृत दशा मे आत्मा से बहिर्मुख होकर फिर प्रवाहित होकर जगत मे कार्य करने लग जाती है।

प्राणशक्ती के विभाग से समान ही शब्दशास्त्र मे शद्ब की शक्ति को प्रकट करनेवाली सात विभक्तियाँ है, वे ही मुखद्वारा तालु के पास आकर व्यक्त होकर जिव्हा द्वारा बोले जाकर सरस्वती वाग के सात प्रवाह होकर ज्ञान कराते है। उनका ठीक ठीक प्रयोग करने से प्रयोक्ता यथार्थ वागविद् होकर सुदेव/सत्यदेव हो जाता है।

इथे अरविंद स्पष्टपणे म्हणतात -

"But this line may, so far as the more grammatical form of it goes, be quite otherwise translated; we may take महो अर्णः in apposition to saraswati and render the verse "Saraswati, the great river, awakens us to knowledge by the perception and shines in all our thoughts." If we understand, the physical river in Punjab, we get an incoherence of thought and expression, which is impossible except in a nightmare or a lunatic asylurn."

"But it is possible to suppose that it . . . means the great flood of inspiration and that there is no reference to the great ocean of the Truth -Consciousness."

<u>यज्ञ</u> :

आतां ही ह्या विश्वातील प्रत्येक गोष्टीबद्दल'सत्यज्ञान' मिळविण्याची जी प्रक्रिया आहे - ती सरस्वती, इला मही वगैरे देवता (वैश्विकशक्तींची नांवे व वैशिष्टे) यांच्यामुळे प्राप्त होते यांत शंकाच नाही, पण तरीही त्या त्या, प्रत्येक व्यक्तीला त्यासाठी एक 'सोमयज्ञ' सोमप्राशन करावे लागते.

हा 'सोमयज्ञ' म्हणजे 'कुंडलिनी शक्ती-मुलाधारातून उर्ध्वगती करून सहस्त्रार चक्रात पोंचवून नंतर काँशसनेस मध्ये एक तऱ्हेचा ज्ञानयज्ञ व त्याच्या योगाने होणाऱ्या सोमज्ञानाचा-खऱ्या ज्ञानाचा, श्रुतीज्ञानाचा स्त्रोत, पुन्हा सर्व अस्तित्वात व शरीरात पसरवण्याचा उद्योग-म्हणजे 'यज्ञ' होय. ह्याच यज्ञाचा. संदर्भ 'ज्ञानेश्वरीच्या ६ व्या अध्यायात आला आहे व त्याचा मतीतार्थ भगवद्‌गीतेतील वाचून प्राप्त झालेल्या पृष्ठभागी / वरवरच्या शाद्बिक ज्ञानाचा खऱ्या बोधांत व आचरणात आणण्याचा आहे.

"Thus Yajna or Sacrifice, which apparently was a ritual of construting an altar, kindling there a fire and offering oblations to 'Agni' and other 'Nature Powers' with the chanting of vedic Mantras was such secret psychological sense a spiritual Sadhana . . ."

"The whole process of the universe", says Shri Aurobindo, "is in its very nature a sacrifice (यज्ञ), volutary or involuntary, self-fulfilment by self-immolation, to grow by giving is the universal law." - V. Jaybee.

**मनोगत** :

आतां या लांबलेल्या लेखाचा आढावा घेतला, तर त्याचे सूत्र लक्षात येईल. 'सरस्वती' ही संकल्पना आमच्या ऋषी मुनीना एका आत्मसाक्षात्कारी श्रुती ज्ञानाने उपलब्ध झाली. ती एक अव्यक्त, गूढ अशी वैश्विक शक्ती अस्तित्वात आहे. तिच्या स्फूर्तीने व साधकाच्या यज्ञक्रियेने त्याला-म्हणजे या मर्त्य देहातील काँशसनेसला या जड व मर्त्य जगातील पृथ्वीवरील अस्तित्वात जे दृश्य वा अदृश्य ज्ञान प्राप्त होते ते चिंतन चित्र सत्याचे नसून एक भ्रमात्मक स्वरूपाचे आहे. पण, स्पिरीच्यूअल साधनेने खरे ज्ञान, प्राप्त होण्यासाठी जी उपलब्धी आहे तिच्या विशिष्ट स्वरूपाचे नांव 'सरस्वती' आहे. त्या सरस्वतीची व त्या कॉस्मिक स्त्रोताची उपमा या आर्यावर्तात आलेल्या व नदीच्या कांठी रहाणाऱ्या मानवी समूहानी त्या हिमालयातून आलेल्या नदीला दिली. त्याच सरस्वतीची मूर्ती व चित्रे आमच्या कलाकारांनी काढली. त्यांचा हेतू या संकल्पनेच्या मूळ स्वरूपाकडे लक्ष वेढण्याचा व साधनेला उद्युक्त करून मर्त्य मानवी जीवाच्या सनातन प्रश्नाला सत्यदर्शन मिळवून देण्याचा होता.

<u>संस्कृती सामर्थ्याचा विसर</u> :

पण, आजचे कलाकार, समाजशास्त्रज्ञ, भौतिकवादी शास्त्रज्ञ, राजकारणी ह्यांना आपल्याच संस्कृतीतील ज्ञानाचा, साधनेचा, उद्दिष्टांचा पत्ता नसावा ही खरोखर अत्यंत खेदाची गोष्ट आहे. त्यांची सर्व शक्ती अत्यंत उथळ वादामध्ये व प्रयत्नामध्ये खर्च होत आहे. व स्वतःच्या वृत्तीतील प्राणी स्तरावरील दोषांचे प्रदर्शन करण्यात होते आहे. हे सर्व उशीरा कां होईना, पण जाणवावे, हा या लेखाचा हेतू आहे.

**श्री. यशवंत साने**
सोनल अपार्टमेंट,
सारस्वत बँकेशेजारी,
अग्यारी लेन, ठाणे.
दूरध्वनी - २५३६८४५०
मोबाईल - ९००४०५१८४७
E mail : Saneyr@mtnl.net.in

●●●

# परिसर वार्ता

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

➢ ब्राह्मण सेवा संघातर्फे दिला जाणारा 'आदर्श शिक्षक' पुरस्कार श्री. प्रकाश पांचाळ यांना प्राप्त झाला.

➢ शाळेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त थोरले बाजीराव पेशवे सभागृह येथे बुधवार दि. ९ सप्टें. रोजी 'हार्मोनियम : एक रसास्वाद' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

➢ चिल्ड्रेन फिल्म स्किन कॉर्पोरेशन (CFSC) तर्फे इ. ६ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना 'वनदेवी का रहस्य' हा पर्यावरणावर आधारित चित्रपट दाखविण्यात आला.

➢ साधना एज्युकेअर सर्व्हिसेसतर्फे 'माझे आवडते शिक्षक' या विषयावर शिक्षक दिनानिमित्त आयोजित स्पर्धेत इ. ६ वी व ७ वी च्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

➢ 'साधना एज्युकेअर सर्व्हिसेस' या संस्थेतर्फे सायली जोशी (९ ड) या विद्यार्थिनीस वह्यांच्या स्वरूपात मदत प्राप्त झाली.

➢ शारदोत्सव कालावधीत सुवर्णमहोत्सवानिमित्त निसर्गगीत पाठांतर स्पर्धा इ. ५ वी ते १० वी साठी आयोजित करण्यात आली.

➢ गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी 'व्यासपीठ' आयोजित 'भूगोलाचे अध्यापन' या उपक्रमशील कार्यक्रमात प्रा. श्री. विद्याधर अमृते यांच्या मार्गदर्शनात श्री. बन्ने सहभागी झाले.

➢ नेहरू विज्ञान केंद्र मुंबई यांच्यामार्फत घेण्यात येणाऱ्या आंतरशालेय स्पर्धेसाठी इ. १० वी तील चार विद्यार्थ्यांचा संघ सहभागी झाला होता. पहिल्या लेखी फेरीतून नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या मुलाखतीसाठी त्यांची निवड करण्यात आली आहे.

➢ डाबर च्यवनप्राश ज्युनियर्स आयोजित प्रश्नमंजुषा स्पर्धेत शुभम् बहाडकर (९ अ) व संदीप पाटील (६ ड) यांना पारितोषिक प्राप्त झाले.

➢ युनायटेड बुडोकॉन कराटे ॲकॅडमीतर्फे घेण्यात आलेल्या काथाज, टीम काथाज व कमिथेज स्पर्धेत कु. अंकिता दुधे (७ ब) हीस अनुक्रमे सुवर्ण, सुवर्ण व रजत पदक प्राप्त झाले.

➢ 'अथर्व थिएटर' आयोजित कला महोत्सव ०९ यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या एकपात्री अभिनय स्पर्धेत ऋतुराज सावंत-पटेल (७ अ) यास उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त झाले.

## सौ. आनंदीबाई केशव जोशी, इंग्रजी माध्यम शाळा

➢ राज्य स्तरीय शालेय टेबल टेनिस स्पर्धेचे आयोजन १ ऑक्टोबर ते ३ ऑक्टोबर २००९ या दरम्यान वायएमसीए, नागपूर येथे करण्यात आले होते. या स्पर्धेत




**टेबल टेनिस स्पर्धेतील विद्यार्थी**

१७ वर्षांखालील मुलींच्या गटात सौ. ए. के. जोशी इंग्रजी माध्यम शाळेच्या संघाने विजेतेपद पटकविले.

या स्पर्धेत १७ वर्षांखालील मुलींच्या गटात मुंबई विभागीय संघाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सौ. ए. के. जोशी शाळेच्या वृषाली प्रसादे, रुचा आमडेकर, प्रणिता बानावली व रिद्धी संखे या विद्यार्थीनींनी नागपूर येथील अंतिम फेरीत पुणे विभागाचा ३-१ असा दणदणीत पराभव करून विजेतेपद प्राप्त केले. अंतिम फेरीत प्रवेश करण्यापूर्वी विजेत्या संघाने, उपान्त्य पूर्व फेरीत औरंगाबाद विभागावर आणि उपान्त्य फेरीत नाशिक विभागावर ३-० अशी मात केली होती.

कु. वृषाली प्रसादे ही इ. १० वी ची विद्यार्थीनी असून महाराष्ट्राच्या १४ वर्षाखालील मुलींच्या संघात तिची निवड झाली आहे. महाराष्ट्राचा संघ गोध्रा येथे होणाऱ्या आंतरशालेय राष्ट्रीय टेबल टेनिस स्पर्धेत सहभागी झाला.

## सौ. आनंदीबाई केशव जोशी, इंग्रजी माध्यम शाळा, प्राथमिक विभाग

➢ दिनांक १३ सप्टेंबर २००९ रोजी घेण्यात आलेल्या श्रीमती जानकीबाई गोखले गीता पठण स्पर्धेत इ. ४ थी तील कु. सानिका गोरे हीस प्रथम क्रमांक मिळाला तसेच अर्णव गद्रे यास द्वितीय आणि कु. शलाका सहस्त्रबुद्धे हीस तृतीय क्रमांक मिळाला. रिया बर्वे व श्रेयस जोशी यांना उत्तेजनार्थ बक्षीस मिळाले.

## वि.प्र.मंडळाचे टीएमसी विधी महाविद्यालय

दिनांक १७/९/०९ रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या ठाणे विधी महाविद्यालयात अभिरूप न्यायालय स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेला विद्यार्थ्यांचा अतिशय चांगला प्रतिसाद लाभला. एकूण नऊ संघांनी दिलेल्या तथ्यांवर आपले मुद्दे मांडले. स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून ठाणे न्यायालयातील निष्णात वकील व महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी ॲड. श्री. पुनीत माहीमकर यांना आमंत्रित करण्यात आले होते.

त्यांनी भावी वकिलांना वकिली व्यवसायातील व्यावसायिकतेविषयी मार्गदर्शन केले. तर महाविद्यालयातील ज्येष्ठ प्राध्यापक श्री. अरुण जालीसादगी यांनी उत्तम वकील होण्यासाठीच्या आवश्यकता विद्यार्थ्यांना समजावून सांगितल्या.

स्पर्धा यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या सौ. श्रीविद्या जयकुमार यांचे मार्गदर्शन लाभले.

**स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थी :**

*प्रथम पारितोषिक विभागून -*

१) नम्रता बोबडे व रोहित जोशी    प्रथम वर्ष
२) शिल्पा भागवत व यतिन पाटकर    प्रथम वर्ष

*द्वितीय पारितोषिक विभागून -*

१) राशी गुप्ता व सुधीर फुटाणे    प्रथम वर्ष
२)पुजा ओके व आदिती आठवले    द्वितीय वर्ष

*तृतीय पारितोषिक -*

१) सी. के. कुलकर्णी    प्रथम वर्ष
२) गणेश मनोहर    प्रथम वर्ष

*उत्कृष्ट वक्ते -*

१) शिल्पा भागवत    प्रथम वर्ष
२) यतिन पाटकर    प्रथम वर्ष
३) राजेश मढवी    प्रथम वर्ष

**वृत्तान्त लेखन - प्रा. प्रज्ञा राजेबहादूर**
(अधिव्याख्याता)

**आंतरराष्ट्रीय कायद्याचे प्रशिक्षण :**

हेग ॲकॅडेमी ऑफ इंटरनॅशनल लॉ या संस्थेने आयोजित केलेल्या २००९ सालच्या उन्हाळी शैक्षणिक शिबीराच्या (Summer Course) निमित्ताने हेग, नेदरलँडस् (हॉलंड) येथे जाण्याचा योग आला. हे शिबीर ६ जुलै ते २४ जुलै या काळात प्रायव्हेट इंटरनॅशनल लॉ (Private Int. Law) व २७ जुलै ते १४ ऑगस्ट या काळात पब्लिक इंटरनॅशनल लॉ (Public Int. Law) या विषयांसंबंधी होते.

हेग, चा उच्चार डच भाषेत 'दान हाग' (Den Haag) केला जातो. हेग ला जागतिक शांततेची राजधानी (Peace Capital of the World) म्हटले जाते. याचे कारण सर्व जागतिक सर्वोच्च न्यायालये हेग येथे आहेत. त्यात International Court of Justice (ICJ), International Criminal Court (ICC) आणि Permanent Court Arbiteation (PCA) यांचा समावेश होतो. त्याच बरोबर International Criminal Tribunal for former Yugoslavia, Special Court for Sierra Leone, Organisation for peevention of Chemical Weapons (OPCW), Hegue Conference on International Law अशा अनेक आंतरराष्ट्रीय कायदा, शांतता यांच्याशी निगडित असलेल्या संस्थाही हेग मध्येच आहेत.

हेग शहराचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे जरी नेदरलँडस् देशाची राजधानी ॲम्स्टरडॅम असली तरी देशाचे विधिमंडळ, सर्वोच्च न्यायालय मात्र हेगमध्ये आहे. बहुतेक सर्वच देशांचे दूतावास देखील हेग मध्येच आहेत. थोडक्यात जगाच्या नकाशावर हेग शहराला एक विशिष्ट व महत्त्वाचे स्थान आहे.

जागतिक न्यायालय (ICJ) ज्या इमारतीत वसलेले आहे. तिला व त्या परिसराला 'पीस पॅलेस' (Peace Palace) म्हणून ओळखले जाते. ही सर्व मालमत्ता खरेतर खाजगी असून कार्नेगी फाउंडेशन हे तिचे मालक आहेत. हे कार्नेगी फाउंडेशन श्री. ॲनड्र्यु कार्नेगी यांनी त्यांच्या देणगीतून उभे केले आहे. श्री कार्नेगी ह्या स्कॉटिश सदगृहस्थांनी अमेरिकेत लोह उद्योगात अमाप संपत्ती मिळवली व तिचा उपयोग त्यांनी जगात शांतता नांदावी यासाठी न्यायालय स्थापण्यासाठी केला. या इमारतीचे बांधकाम १९०३ साली सुरू करण्यात आले. हेग येथे आयोजित केलेल्या १८९९ व १९०७ सालच्या जागतिक शांतता परिषदेतच असे न्यायालय स्थापण्याचे ठरवले होते. सन १९२० मध्ये इथे Permanent Court of Justice स्थापण्यात आले. युनायटेड नेशनस्ची १९४६ मध्ये स्थापना झाल्यावर त्याचाच एक भाग म्हणून International Court of Justice (ICJ) ची स्थापना झाली. कार्नेगी फाऊंडेशनच्या या मिळकतीतच ICJ व्यतिरिक्त Permanent Court of Arbiteation, Peace Palace Library व हेग ॲकॅडेमी स्थीत आहेत.

हेग ॲकॅडेमीची स्थापना १९२३ मध्ये झाली. ही ॲकॅडेमी म्हणजे कायमस्वरूपी अशी शैक्षणीक संस्था किंवा विद्यापीठ नाही. पण या संस्थेतर्फे वर्षभर काही उपक्रम घेतले जातात. त्यातील दरवर्षीचे उन्हाळी शिबीर हा सर्वांत महत्त्वाचा कार्यक्रम. १९२६ सालापासून दरवर्षी हे शिबीर आयोजिले जाते. ॲकेडेमीच्या कार्यकारी मंडळाला 'Curatorium' म्हटले जाते. या मंडळाचे सध्याचे अध्यक्ष युनायटेड नेशनसचे पूर्वीचे सचिव श्री. घाली हे आहेत. शिबीरात शिकवायला मिळणे हा आंतरराष्ट्रीय कायद्याच्या क्षेत्रात बहुमान समजला जातो. जागतिक न्यायालये, युरोपिअन कोर्ट, नावाजलेली कायद्याची विद्यापीठांमधले प्राध्यापक, तज्ज्ञ, वकील या संस्थेत शिकवण्यासाठी येतात. शिबीरात शिकवण्यासाठी निवड, त्यांचे विषय ३-४ वर्ष आधीपासून ठरवले जातात. जागतिक न्यायालयाच्या आवारातच ॲकॅडेमी असल्यामुळे तिला पण आपोआप महत्त्व आले आहे.

ह्या शिबीराचे आयोजन वखाणण्याजोगे होते. त्याचे उद्घाटन व समारोप दोनीही अत्यंत साधेपणाने केला होता. स्वागत समारंभ, पुष्प गुच्छ देणे घेणे, हार तूरे या सर्व गोष्टी टाळल्या होत्या. पाहुण्यांची, व्याख्यात्यांची ओळख अगदी थोडक्यात असे. या वक्त्यांच्या वेळेचा पूर्ण उपयोग शिकवण्यासाठी केला जात होता. वेळेची मर्यादा खूपच तंतोतंत पाळली जात असे. सकाळी ९.२० वाजता तास सुरू होत. जेमतेम २-३ मिनिटे, उशीरा आलेल्यांना प्रवेश दिला जाई. नंतर सभागृहाचे दरवाजे बंद केले जायचे. व्याख्यात्यांना व्याख्यानात व्यत्यय येऊ नये हा त्या मागचा उद्देश. परंतु उशिरा येणाऱ्यांचे तास बुडू नयेत म्हणून बाजूच्या वर्गात बसून ऐकण्याची सोय केली होती. २५०-३०० जण बसू शकतील असे अद्ययावत सभागृह होते. प्रत्येकाला हेड फोनची सोय होती. इंग्रजी व फ्रेंच अशा अधिकृत भाषा असल्याने प्रत्येक भाषणाचे भाषांतर केले जायचे. या सकाळच्या सत्रात माझ्या सारख्या प्राध्यापकांना खटकणारी गोष्ट एकच होती, ती म्हणजे या सत्रात व्याख्याते व आमच्यात संवाद होत नसत. दुपारी सत्रात Seminar, Directed studies असत. त्यावेळेस चर्चा असत, एखाद्या 'केस'वर उहापोह केला जायचा.

हे शिबीर म्हणजे एक संक्षिप्त आंतरराष्ट्रीय समुदायच होता. दोनीही शिबीरांत ८० ते ९० देशांमधून शिबीरार्थी सहभागी झाले होते. त्यातही BRIC देशांतून म्हणजे Brazil, Russia, India व China या देशांतून येणाऱ्यांची संख्या लक्षणीय होती. अर्थात यास या देशांचा जागतिक अर्थकारणात, आंतरराष्ट्रीय व्यापाराला वाढणारा प्रभाव हे त्यामागचे कारण आहे. एकूणच जरी जवळजवळ सर्वच वयोगटातले विद्यार्थी या शिबीरात असले, तरी त्यात तरुण तरुणींचाच सहभाग जास्त होता. ते सर्व बहुतेक कायद्याचे पदवीधर होते किंवा त्यांचे संशोधनाचे काम चालू होते. भारतातून आम्ही १६ जण होतो, त्यातही १०-१२ विद्यार्थी होते व ते सर्व बहुतेक कायद्याच्या विशेष विद्यापीठांतून (Law Schools) मधून आलेले होते. तरुणांमध्ये Laptop/note book चा वापर मात्र खूप जास्त होता. पण मोबाईलची क्रेझ मात्र कुणात दिसली नाही.

संस्थेचे आंतरराष्ट्रीय कायद्यांच्या पुस्तकांचे ग्रंथालय हे जगातले सर्वात मोठे आहे. त्याचा वापर आंतरराष्ट्रीय न्यायालयही करते. वाचनासाठी सुसज्ज व्यवस्था आहे. पुस्तकांची माहिती, त्यांची देव घेव ही कॉम्प्युटर वर होत असे. प्रत्येकासाठी मोठे लॉकर, जॅकेट, रेनकोट, छत्र्या ठेवण्यासाठी सोय आहे. सकाळ संध्याकाळ कँटीन उघडे असे. भोजनगृहाची सोय होती.

हेग अ‍ॅकेडेमीचे उन्हाळी शिबीर 'हेग' या शहरासाठी देखील एक वर्षातील महत्त्वाची व लक्षणीय घटना समजली जाते. हेग शहराच्या महापौरांतर्फे सर्व शिबीरार्थींसाठी स्वागत समारंभ आयोजित केला जातो. स्वत: महापौर जातीने हजर राहतात व शिबीार्थींशी संवाद साधतात. हेगच्या टाऊन हॉलमधे त्याचे आयोजन केले जाते. शीतपेये, फळांचे रस, वाईन, हलका फराळ अशी मेजवानी दिली जाते. याच बरोबर वेगवेगळे दूतावासही त्या त्या देशाच्या शिबीरार्थींसाठी स्वागत समारंभ आयोजित करतात. भारताचे उच्चायुक्त श्री. मनबीर सिंह यांनीही आम्हां सर्वांना त्यांच्या निवासस्थानी पाहुणचारास बोलावले होते. असे दुर्मीळ योग या शिबीरांमुळे येतात हे मात्र खरे. अ‍ॅकेडेमीचे संचालक प्रोफेसर डुडे यांनीही आम्हां शिबीरार्थींना छोट्या छोट्या गटांमध्ये घरी बोलावले होते. या सर्व कार्यक्रमांमुळे आम्हां शिबीरार्थींमध्ये छान मैत्रीचे जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले होते.

या जोडीनेच शिबीराच्या काळात जागतिक न्यायालयांना भेटी, हेग शहराच्या ऐतिहासीक स्थळांना भेटी आयोजिल्या होत्या. हेगच्या जवळ असलेल्या लंडन या विद्येच्या माहेरघरास भेट, डेल्फट या शहरास भेट यांनी कार्यक्रम समृद्ध केला होता. हेग शहराला सुंदर समुद्र

किनारा लाभला आहे. उन्हाळा, छान हवा, सूर्य प्रकाश यामुळे किनारा माणसांनी फुललेला असे. त्यावर रुर्फींगची मजा हेगवासी मनमुराद लुटताना दिसत. आम्हा शिबिरार्थींसाठी हेगच्या वाहतुक कंपनीने संपूर्ण शिबीराच्या काळात वापरण्यासाठी एक मोफत पास दिला होता. त्यामुळे हेग मध्ये कोठेही, कधीही फिरणे, ट्राम व बस नी अत्यंत सुखकर झाले होते. त्या पासने आम्ही हेगच्या कानाकोपऱ्यात हिंडून घेतले.

असे हे उन्हाळी शिबीर. बघता बघता सहा आठवडे कधी संपले ते कळले नाही. शेवटच्या दिवशी सर्वच जण भावुक झाले. सर्वांमध्ये मैत्रीचे आपुलकीचे नाते जडले होते. कदाचित या नंतर कधीच एकमेकांची गाठ पडणार नव्हती. पण निरोप घेणे भागच होते. आमचे शिबीर १४ ऑगस्टला संपले. परतीचे तिकीट १६ तारखेचे होते. आम्ही सर्व १५ ऑगस्टला भारतीय दूतावासात स्वातंत्र्यदिन साजरा करण्यास हजर राहिलो. सातासमुद्रापार ध्वजवंदन करताना ऊर भरून आला होता. आता आम्हांलाही मातृभूमीची आणि आपल्या माणसांची ओढ लागून राहिली होती.

**प्रा. अनंत गद्रे**

## विद्या प्रसारक मंडळ

विद्या प्रसारक मंडळाच्या इतिहासाच्या ग्रंथाची तिसरी आवृत्ती दि. ५ सप्टेंबर रोजी झालेल्या दीक्षान्त समारंभात डॉ. अरुण निगवेकर यांच्या हस्ते प्रकाशित झाली. 'तयाचा वेलु गेला गगनावरी' या इतिहास ग्रंथाचे पुनर्लेखन व अद्यायावतीकरण विद्या प्रसारक मंडळाचे ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. मा. ना. पाटील यांनी केले आहे. दिशाच्या पुढील अंकात या इतिहास ग्रंथाचा वेगळा परिचय देण्यात येईल. या ग्रंथाच्या पहिल्या आवृत्तीचे प्रकाशन डिसेंबर' ९६ मध्ये तर दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन एप्रिल २००० मध्ये झाले होते. या ग्रंथाचे इंग्रजी रूपांतर जानेवारी २००५ मध्ये पुस्तकरूपाने प्रकाशित झाले.

'तयाचा वेलु गेला गगनावरी' या तृतीय आवृत्ती निमित्ताने श्री. वि. करंदीकर, ज्येष्ठ कार्यकारिणी सभासद यांचे मनोगत:

''तयाचा वेलु गेला गगनावरी'' या मराठी इतिहास पुस्तकाची ही तिसरी आवृत्ती. या अगोदर १९३२ ते १९९६ कालावधीच्या पहिल्या आवृत्तीचे इतिहास लेखन डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या प्ररणेने श्री. अ. धों. टिळू, तत्कालिन कार्यवाह, प्रा. मोहन पाठक व श्री. दिलीप जोशी, कार्यकारिणी सभासद यांच्या त्रिसदस्य लेखन समितीने केले व ही पहिली आवृत्ती डिसेंबर, १९९६ मध्ये ज्येष्ठ साहित्यिक श्री. रविंद्र पिंगे यांचे हस्ते प्रकाशित झाली.




**'तयाचा वेलु गेला गगनावरी' चे प्रकाशन – व्यासपीठावर डावीकडून वि.प्र. मंडळाचे ज्येष्ठ कार्यकर्ते मा. आण्णासाहेब तथा श्री. वि. करंदीकर, वि. प्र. मंडळाचे कार्यवाह श्री. अुत्तमराव जोशी, प्रमुख पाहुणे डॉ. अरुण निगवेकर व वि. प्र. मंडळाचे कोषाध्यक्ष श्री. मा. य. गोखले**

तदनंतर १९९६ ते २००० पर्यंतचा इतिहास द्वितीय आवृत्ती म्हणून कार्याध्यक्ष, श्री. अ. धों. टिळू यांनी लिहून ऑगस्ट, २००० मध्ये ७३ व्या आखिल भारतीय

संमेलनाचे अध्यक्ष डॉ. य. दि. फडके यांचे हस्ते प्रकाशित केली.

"A seedling grows into a tree" या नावाने मंडळाचे ज्येष्ठ सभासद श्री. मा. ना. पाटील यांनी मंडळाचा १९३२ ते २००० पर्यंतचा संक्षिप्त इतिहासही इंग्रजीमध्ये जानेवारी, २००५ मध्ये प्रसिद्ध लेखक व साहित्यिक श्री. वि. आ. बुवा यांचे हस्ते प्रकाशित केला.

मागील वर्षी डिसेंबर, २००८ मध्ये श्री. मा. ना. पाटील यांचे मनात मंडळाच्या तिसऱ्या आवृत्तीचे लेखन व प्रकाशन व्हावे असे आले. मंडळाला २००९-१० मध्ये होणाऱ्या ७५ वर्षाचे निमित्त साधून त्यांनी परिश्रमपूर्वक या तृतीय आवृत्तीचे लिखाण सुरू केले व ते आज (१९३२ ते ऑगस्ट २००९ पर्यंतच्या मंडळाच्या उद्बबोधक गौरव इतिहास) 'तयाचा वेलु गेला गगनावरी' याच नावाने मा. डॉ. अरुण निगवेकर यांचे शुभ हस्ते पार पडत आहे.

या इतिहासात मंडळाने वेळोवेळी केलेली कामे, मंडळाची झालेली मंद कूर्मगतीने पण सतत चालू असलेली वाढ, मंडळावर आलेली आपत्ती, संकटे व त्यावर केलेली मात, कार्यकर्त्यांनी केलेल्या कामातील सहकार व अध्यक्ष/कार्याध्यक्ष यांच्यावर ठेवलेला सार्थ विश्वास इत्यादी गोष्टींचे दर्शन घडते. अगदी सुरुवातीपासून ते आजपर्यंत मंडळाच्या प्रगतीला ज्या ज्या व्यक्तींचा हातभार लागला त्यांचा आवर्जून यात उल्लेख आहे. या सर्व व्यक्तींना या लेखी इतिहासाने भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली आहे.

नुसती उत्तम इमारत व सुविधा असून शाळा महाविद्यालये चालत नाहीत तर हल्लीच्या नव्या पद्धती, प्रथा, सुधारलेली शैक्षणिक सूत्रे विद्या प्रसारक मंडळ लक्षात घेते व ही ज्ञान गंगा वहाती ठेवते. विद्यार्थी-शिक्षक यांचा प्रभावीपणे सुसंवाद हवा असतो. त्यास उत्तम ग्रंथालयाची जोड असावी लागते. मंडळाच्या सर्व विभागातून संख्यात्मकच नव्हे तर गुणात्मक वाढ होत असल्याचे दिसून येते. मंडळ सामाजिक बांधीलकी जपून आहे. विद्या प्रसारक मंडळाचे नशीबच असे बलवत्तर आहे की त्याला पुढे नेणारे मेहनती सच्चे नि:स्वार्थी कार्यकर्ते सुरुवातीपासूनच मिळाले व मिळतीलही. त्यांच्यात सहकाराची भावना आहे. सर्वजण एक मताचे व एका विचाराचे आहेत असे दिसून येते. वैयक्तिक हितापेक्षा ते सर्व समाजाच्या हिताची काळजी घेणारे आहेत. उत्तम दर्जाचे शिक्षण देणारी विद्या प्रसारक मंडळ ही एक नामंकित महत्त्वाची शैक्षणिक संस्था ठाणे शहराला भूषणावह आहे. अशा या शैक्षणिक संस्थेच्या जीवन कार्याचा इतिहास हा समाजाला उत्तम गती प्राप्त करून देऊ शकतो. तसेच पुढील पिढीलाही ह्या लेखी इतिहासाचे उत्तम मार्गदर्शन मिळू शकेल. संस्था उदयास येतात, त्यांची वाढ होत असते व त्या वयानुसार रौप्य महोत्सव, सुवर्ण महोत्सव वगैरे यथोचित साजरे करतात व विसरतात. पण लेखी स्वरूपात इतिहास म्हणून क्वचितच प्रकाशित करतात.

या तृतीय आवृत्तीचे मुद्देसूद लिखाण, विषयाची अनुरूप मांडणी, रसाळ व साधी सोपी भाषा व्यवस्थितपणे विषयाचा अर्थ लावणारी आहे. या पुस्तकात विशेष परिशिष्टे जोडली आहेत. एका परिशिष्टात संस्थेमध्ये सुरुवातीपासून तनमन धनाने यथार्थपणे कार्य केलेल्या कार्यकर्त्यांची व पदाधिकाऱ्यांची यादी आहे. तर सर्व छायाचित्रे माहितीनुसार छापली आहेत. पहिल्या व दुसऱ्या आवृत्तीत छायाचित्रांचे एक वेगळे परिशिष्ट होते. तसे यात नाही. आजी व माजी पदाधिकाऱ्यांची व्यक्तिविशेष म्हणूनही एक वेगळे परिशिष्ट आहे. सुरुवातीपासूनच्या कार्यकर्त्यांच्या नावाची सूची वेगळी आहे.

ही तृतीय आवृत्ती विद्या प्रसारक मंडळाचा एक महत्त्वाचा दस्तऐवज म्हणून ओळखला जावा असे मला वाटते. हा इतिहास वाचून वाचणाऱ्यांचे ज्ञान वाढेल व

त्याला मनोवेधक माहिती मिळेल यात शंकाच नाही.

व्यक्तीच्या आयुष्यात ७५ वर्षे फार वाटतात. परंतु संस्थेच्या वयात ती जास्त वाटत नाहीत. संस्था अमर असते. फक्त पदाधिकारी व कार्यकर्ते काळानुरूप बदलत असतात. २०३५ सालात विद्या प्रसारक मंडळाची शताब्दी होईल. तेव्हा आम्ही ... श्री. मा. ना. पाटील, श्री. वि. करंदीकर नसू. विद्या प्रसारक मंडळ ही संस्था मात्र त्यावेळेस बरीच उंच हिमालयाएवढी झालेली असेल.

येथे मी माझे मनोगत संपवतो व मी डॉ. अरुण निगवेकर यांना विनंती करतो की त्यांनी विद्या प्रसारक मंडळाच्या इतिहासाच्या या तृतीय आवृत्तीचे प्रकाशन त्यांच्या शुभहस्ते करावे.

**श्री. वि. करंदीकर**
ज्येष्ठ कार्यकारिणी सभासद

•••

---

(पान २३ वरून)

**सार्थ मंत्रराज**

**''नम: शांताय दिव्याय सत्यधर्म स्वरूपिणे।**
**स्वानंदामृत तृप्ताय श्रीधराय नमोनम:।।''**

या ३२ अक्षरी मंत्राचे सामर्थ्य ज्यांच्या प्रत्यसास आले असे अनेक भाविक, समर्थ, भक्त, श्रीधरस्वामींचे भक्त महाराष्ट्रात आहेत. या मंत्रातील प्रत्येक अक्षर दिव्यत्वाने भरलेले आहे. महाराष्ट्रातील अनेक घरांमध्ये तांब्याच्या पत्र्यावर कोरण्यात आलेल्या या मंत्राचा देवघरात, रोजच्या पूजेत व मंत्रघोषात समावेश आहे.

मंत्रसामर्थ्य हा गहन आणि प्रचीतीचा विषय आहे. 'गुरुमंत्रो मुखे यस्य तस्य सिद्ध्यंति नान्यथा' असे श्री गुरुंचे वचन आहे. श्रद्धापूर्वक अंत:करणाने या मंत्राचे पठण करणारांना अनेक अनुभव आलेले आहेत. गुरुशिष्य परंपरा असणाऱ्या आपल्या भारत धर्मीय परंपरांमध्ये शिष्याने गुरुला अनन्यभावे शरण जाणे, गुरुमंत्र प्राप्त करणे याला विलक्षण पावित्र्य आहे.

''प.पू. भगवान श्रीधर स्वामी महाराज यांच्या 'सार्थ मंत्रराज'' या पुस्तकात विवेचनाच्या ओघात मंडुकोपनिषद, गुरुगीता, रामतापिनी उपनिषद, अष्टावक्र गीता, इ. अनेक ग्रंथांच्या आधारे गुरू, गुरुमंत्र, ब्रह्म इ. अनेक कठीण संकल्पनांचे सहज सोपे निरूपण केले. जग आनंदस्वरूप आहे हे सांगताना ते म्हणतात, ''सर्वही जगात ओतप्रेत भरून असणाऱ्या आनंद स्वरूपाचा प्रकाश नसेल तर जगातील कोणतेही प्राणी जिवंत असणे शक्य नाही.'' (पृ. ३१) गुरुशिष्यांचे ऐक्य या संबंधातील विचारही असेच अर्थगर्भ आहेत.

गुरुमंत्रावरील एक उत्तम पुस्तक असा या पुस्तकाचा उल्लेख करावा लागेल. सज्जनगडच्या श्रीधर कुटी ट्रस्टने १९८८ साली प्रकाशित केलेल्या पुस्तकाच्या उपलब्धी विषयी काही सांगता येणे कठीण आहे. पण सज्जनगडावरील या ट्रस्टकडे चौकशी करता येऊ शकते.


समर्थाच्या साहित्याचे व्यासंगी अभ्यासक व तत्त्वज्ञानाचे वाचक श्री. ह. श्री. परांजपे यांनी मला सदर पुस्तक पाठवले म्हणून वाचनाचा योग आला. श्री. परांजपे ठाण्याच्या जोशी-बेडेकर महाविद्यालयामधून निवृत्त झालेले ग्रंथपाल व या विषयातील अधिकारी असे वाचक आहेत. हे पुस्तक उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे आभार मानण्यासाठी शब्द अपुरे आहेत.

**मोहन पाठक**
ठाणे

•••

# ।। कविवर्य केशवसुत यांच्या अक्षरातील कविता ।।

(या महिन्यातील ७ तारखेस कविवर्य केशवसुतांची पुण्यतिथी आहे. त्यानिमित्ताने त्यांचे स्मरण करण्यासाठी ही त्यांच्याच अक्षरातील कविता - संपादक)



संध्याकाळ.

संध्याकाळ असे : रवी उतरतो आहे समुद्रावरी,
त्याचें बिम्ब सुरेख चुम्बिल पहा लाटांस या लौकरी;
मातीला मिळुनी गळूनि पडलें तें पुष्प जाई जसें,
लोपाला तसें ! १
आकाशीं ढग हे पहा विखुरले, त्यांच्यावरी सुन्दर
रंगाच्या खुलती छटा, बघुनि त्या येतें स्वचित्तावर :–
हा मृत्युंगत होतसे दिवस, तन्मस्तिष्कपिंडांवरी
येती अक्षयमोक्षसिन्धुलहरी तेजोयुता यापरी ! २
(पक्षी हे घरट्यांकडे परतुनी जातात कीं आपुले,
त्यांलागीं किलबील शब्द करुनी आनन्द देती पिलें;
गाई या कुरणांतुनी परततां हम्बारवा फोडिती,
त्यांचे उत्सुक वत्स त्यांस अपुल्या दीनस्वरें बाहती. ३
आनन्दी दिसती युवे, फिरकती जे या किनाऱ्यावरी,
ध्याती ते निज, रमते, उल्हासुनी अन्तरीं;
जी ही मन्दिरराजि पैल दिसते, तीच्या गवाक्षांतुनी
झाल्या त्या असतील सुन्दरी युवती चित्तीं असें आणुनी :– ४
"अस्ताला जातसे दिनमणी; रात्री अहा येतसे !
रात्री ! जादु किती नामामधें
प्रेमाचें हृदयीं उषीं कुमुद जें संकोच गे पावलें
देसी त्यास विकास तूं !–" ५
संध्येला प्रणयी तुम्ही जन सुखें द्या हो दुवा, मी करीं
हेवा तो न मुळीं; नसे प्रणय तो माझ्याहि का अन्तरीं ?
आहें मी घर सोडुनी पण दुरी; चित्तीं म्हणूनी असें
मी संध्यासमयीं उदास;–अथवा व्हावें तरी मीं कसें ? ६

रत्नागिरी
१४ जुलै १८९३

**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- *अत्याधुनिक दृक्‌श्राव्य यंत्रणा*
- *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
- *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*

*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❈ संपर्क ❈**

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.